१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, गुरुवार ५ मार्च, २०२६ • वर्ष-१०३, अंक-३५९, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 103, Issue - 359 Marathi - Daily - Mumbai, 5 March, 2026 Page- 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

उपमुख्यमंत्र्यांच्या विमानाला उडवण्याची धमकी? रोहित पवारांचा दावा?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# एकनाथ शिंदे दावोसला जात असताना इराण हद्दीत त्यांचे विमान पाडणार होते! नवा गौप्यस्फोट

■ मुंबई



**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार सतत या अपघाताबाबत धक्कादायक माहिती जाहीर करत नवनवे आरोप करत आहेत. त्यांनी आजही मुंबईत पत्रकार परिषद घेऊन विमान अपघातापूर्वी बारामतीत अपघाताच्या ठिकाणी रेकी करण्यासाठी काही लोक आले होते, असे स्थानिकांनी सांगितल्याचा दावा केला. इतकेच नव्हे तर त्यांनी दावा केला की, एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना दावोसला याच व्हीएसआर विमानाने जात होते तेव्हा इराणच्या हवाई हद्दीत त्यांचे विमान पाडणार होते. रोहित पवार यांच्या या दाव्याने खळबळ माजली आहे.**

**अपघाताच्या** तपास अहवालातील अनेक त्रुटींवरही गंभीर प्रश्न उपस्थित करत व्हीएसआर कंपनीला कुणीतरी वाचवते आहे, असा आरोप त्यांनी केला. रोहित पवार म्हणाले की, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना तीन वर्षांपूर्वी दावोसला जात असताना याच व्हीएसआर कंपनीच्या निष्काळजीपणामुळे त्यांचा जीव धोक्यात सापडला होता.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना जानेवारी २०२३ मध्ये ते स्वित्झर्लंडला दावोस दौऱ्यावर निघाले होते. त्यावेळी त्यांनी याच 'व्हीएसआर' कंपनीचे व्हीटी-सीएमआर विमान भाड्याने घेतले होते. मुंबईहून उड्डाण केल्यानंतर विमान बहारिनमध्ये इंधन भरण्यासाठी थांबले. त्यानंतर विमान दावोसला जाताना इराणच्या हवाई क्षेत्रात शिरले. विमानाने इराण हवाई क्षेत्रात प्रवेश करताच या विमानाला परत फिरण्याचा इशारा देण्यात आला. विमान परत घ्या नाहीतर हे विमान पाडण्यात येईल, असे इराण प्रशासनाने सांगितले. याचे कारण इराणच्या हवाई हद्दीत प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेली परवानगी या कंपनीने घेतलीच नव्हती. हे विमान पाडण्याचा इशारा मिळाल्यानंतर विमान घाईने वळविण्यात आले आणि ते इराकच्या हवाई हद्दीत गेले. इथेही हाच प्रकार घडला. इराकने हे विमान ताबडतोब त्यांच्या हवाई हद्दीतून बाहेर नेण्यास सांगितले. विमान बाहेर नेले नाही तर आम्ही ते पाडू, असा इशारा पुन्हा देण्यात आला. याचेही कारण तेच होते. कंपनीने इराकच्या हद्दीत प्रवेश करण्याची अधिकृत परवानगी घेतलेली नव्हती. अखेरीस विमान परत बहारिनला आणले. बहारिनमध्ये सुमारे ३ तास ताटकळल्यानंतर आणि पुन्हा आवश्यक परवानगी मिळवल्यानंतर हे विमान झ्युरिचकडे रवाना झाले. हा केवळ तांत्रिक बिघाड नसून व्हीएसआर विमान कंपनीने राज्याच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीच्या सुरक्षेशी केलेली मोठी तडजोड होती. याच 'व्हीएसआर' कंपनीवर कोविड काळात रुग्णांची अवास्तव आर्थिक लूट, आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन केल्याचाही आरोप आहे. अरब अमिरातीत या कंपनीवर सहा महिन्यांची बंदी घालण्यात आली होती. ज्या कंपनीच्या विमानामुळे एकनाथ शिंदे दोन देशांच्या लढाऊ विमानांच्या निशाण्यावर आले होते, ज्या कंपनीमुळे राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या प्रवासाच्या सुरक्षित इतका मोठा निष्काळजीपणा झाला, त्याच कंपनीच्या कार्यपद्धतीकडे तपास यंत्रणा आणि डीजीसीए दुर्लक्ष का करत आहेत? शिंदे यांच्या पक्षाने व्हीएसआर विमानाने प्रवास करणार नसल्याचे घोषित केले. मात्र नुकतेच मंत्री दादा भुसे यांनी त्या विमानाने प्रवास केला. त्यामुळे नेत्यांनी यासंदर्भात सतर्क राहायला हवे, असे रोहित पवार म्हणाले.

रोहित पवार यांनी आरोप केला की, विमान अपघाता-संदर्भातील एएआयबीचा अहवाल द्यायचा म्हणून दिला आहे. अपघाताचा अहवाल तयार करण्यासाठी एक महिन्याचा अवधी लागला. त्यामुळे अहवालात चुका होणे अपेक्षित नव्हते. या अहवालात झाडाला विमान धडकून अपघात झाल्याचे म्हटले आहे. पण तिथे फक्त झुडपे आहेत. झुडुपांची उंची आणि विमानाची उंची जुळत नाही. केवळ रिपोर्ट द्यायचा म्हणून दिला आहे. पान ७ वर

## आमचे वरपर्यंत संबंध व्ही.के.सिंगची धमकी

रोहित पवार यांनी व्हीएसआरचा मालक व्ही.के.सिंग याच्यावर गंभीर आरोप केला. ते म्हणाले की, आमच्या माणसाला व्हीएसआरचा मालक व्ही.के.सिंगचा व्हॉट्सॲपवर कॉल आला होता. त्याने सांगितले की, एएआयबीने मला क्लिअरन्स दिला आहे. अधिकची माहिती तुम्हाला कशाला पाहिजे? खालपासून वरपर्यंत आमची ओळख आहे. कोणीच आमचे काही बिघडवू शकत नाही. आताही आमची विमाने उडत आहेत. सरकारही आमचे विमाने वापरत आहे, तर तुम्हाला काय अडचण आहे? व्हॉट्सॲप हॅकिंगची यंत्रणा असेल तर हे शोधून काढा. अपघाताच्या आधी सहा महिने सिंग कुणाशी बोलत होता, दिल्लीत महाराष्ट्र सदनमध्ये सिंग कुणाला भेटला होता, हेही शोधून काढा. महाराष्ट्राचा एवढा मोठा नेता गेला तरी एवढी हिंमत येते कुठून?

धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी, मूळव्याध इ. विकारांवर प्रभावी !
आजच रात्री घ्या, सकाळी OK!
डॉ. अभिजीत 9422011723

## ट्रम्पनी उद्या व्हाईट हाऊसमध्ये शस्त्रास्त्र कंत्राटदारांना बोलावले

**इराण - इस्त्रायल युद्धामुळे मध्यपूर्वेत संघर्ष वाढला आहे. इराणने अमेरिकेचे आखातातील लष्करी व हवाई तळ उद्ध्वस्त केल्याने अमेरिकेच्या शस्त्रसाठ्यात मोठी घट झाल्याची माहिती आहे. शस्त्रास्त्र निर्मितीत वेग आणावा हे सांगण्यासाठी व्हाईट हाऊसने प्रमुख संरक्षण कंत्राटदारांसोबत शुक्रवारी ६ फेब्रुवारीला आपत्कालीन बैठक आयोजित केली आहे.**

■ वॉशिंग्टन

**राष्ट्राध्यक्ष** डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने देशातील आघाडीच्या संरक्षण उत्पादन कंपन्यांना उत्पादन क्षमता तातडीने वाढवण्याचे संकेत दिले आहेत. या बैठकीत लॉकहिड मार्टिन, आरटीएक्स कॉर्पोरेशन यांसारख्या प्रमुख



शस्त्रनिर्मिती कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सहभागी होण्यासाठी निमंत्रण देण्यात आले आहे. पेंटागॉनकडून संरक्षण कंत्राटदारांवर भागधारकांना नफा वाटप करण्याऐवजी उत्पादन वाढीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी दबाव टाकला जात आहे. कमी कामगिरी करणाऱ्या कंपन्यांची स्वतंत्र यादी जाहीर करून त्यांना सुधारणा आराखडा सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली जाण्याची शक्यता आहे. आवश्यक सुधारणा न झाल्यास करार रद्द करण्याचाही इशारा देण्यात आला आहे. अमेरिकेचे नेतृत्व सुमारे ५० अब्ज डॉलरच्या पूरक संरक्षण बजेट प्रस्तावावर काम करत असून, या निधीतून मध्यपूर्व आणि इतर संघर्षांमध्ये वापरलेल्या शस्त्रास्त्रांची भरपाई केली जाणार आहे. मात्र अमेरिकेत ट्रम्प यांच्या या युद्धाच्या निर्णयाला विरोध होत आहे. अमेरिकी काँग्रेसमध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे वर्चस्व असले तरी विरोधी डेमोक्रेटिक पक्षांना युद्धाला विरोध करणारा प्रस्ताव काँग्रेसमध्ये मांडण्याची तयारी केली आहे.

२०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिकेने युक्रेनला मोठ्या प्रमाणावर तोफखाना, क्षेपणास्त्रे आणि संरक्षण प्रणाली पुरवल्या. त्यानंतर गाझा पट्टीमधील संघर्षात इस्त्रायलला दिलेल्या मदतीमुळेही पान ७ वर

## रोहित पवारांचा प्रफुल्ल पटेलांवर बोईंग खरेदी प्रकरणी गंभीर आरोप

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** अजित पवार यांचा मृत्यू अपघात की घातपात याचा पाठपुरावा करणारे शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार यांनी प्रफुल्ल पटेलांशी संबंधित बोईंग खरेदी प्रकरणावरून पटेलांवर पुन्हा गंभीर आरोप केले.

प्रफुल्ल पटेल केंद्रीय नागरी विमान उड्डाण खात्याचे मंत्री असताना बोईंग ७८६ जातीची १४ विमाने खरेदी करण्याचा व्यवहार वादग्रस्त ठरला होता. बोईंगच्या या विमानात काही



त्रुटी आढळून आल्या होत्या. करारातील अटींचे उल्लंघन करत कंपनीने विमानांची डिलिव्हरी एक वर्ष उशिराने दिली. तरीही या कंपनीबरोबरचा खरेदी करार रद्द करण्यात आला नाही. पटेलांनी या काळात फायदेशीर ठरणारे हवाई मार्ग खासगी विमान कंपन्यांना आंदण दिले, असाही आरोप आहे. या प्रकरणी ईडी आणि सीबीआय स्वतंत्र तपास करत आहेत. हा तपास अद्याप पूर्ण झालेला नाही. तो जर वेळीच पूर्ण झाला असता तर बोईंगमधील त्रुटी जगासमोर आल्या असत्या. मग एअर इंडियानेही बोईंगच्या सर्व विमानांचे उड्डाण थांबवले असते.

## 'जितो' संघटना दुबईतील भारतीयांच्या मदतीला धावली

■ मुंबई

**युध्दामुळे** दुबईमध्ये अडकून पडलेल्या भारतीयांच्या मदतीसाठी जैन समाजातील उद्योजकांची जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) ही संस्था पुढे सरसावली आहे. युध्दस्थितीमुळे दुबईमधील हॉटेलांचे भाडे वाढले आहे आणि विमान कंपन्यांनीदेखील संधीचा फायदा घेत तिकीट दरात भरमसाठ वाढ केली आहे. त्यामुळे जितोशी संबंधित एका उद्योजकाने दुबईत भारतीयांच्या राहण्या-खाण्याची मोफत व्यवस्था केली आहे. राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री गिरीश महाजन यांनी ही माहिती दिली. तसेच जितो संघटनेचे आभारही मानले.


जितोशी संबंधीत आणखी एका उद्योजकाने पाचशे भारतीयांची राहण्याची आणि जेवणाची जबाबदारी उचलली आहे.

## फळे, साखर, कांद्याची निर्यात ठप्प महाराष्ट्राला आखाती युध्दाचा फटका

■ जळगाव

**पश्चिम** आशियात युध्दाची व्याप्ती वाढल्याने त्याचा प्रतिकूल परिणाम भारतीय व्यापारावर होऊ लागला आहे. विशेषतः महाराष्ट्रातून आखाती देशांमध्ये होणारी तांदूळ, द्राक्षे, केळी, कांदा आणि साखर या मालाची निर्यात सध्या पूर्णपणे थांबली आहे. या हजारो टन मालाचे कंटेनर नवी मुंबईतील जेएनपीए बंदरात पडून असल्याने तो माल सडण्याचा धोका आहे.

आखाती युध्दाचा सर्वाधिक फटका द्राक्ष आणि कांदा निर्यातीला बसला आहे. दुबईतील मुख्य बाजारपेठ तात्पुरती बंद करण्यात आल्याने



कांदा निर्यात थांबली आहे. परिणामी जेएनपीए येथे कांद्याचे दीडशेहून अधिक कंटेनर अडकून पडले आहेत. रमजानच्या महिन्यात आखाती देशांत मोठ्या प्रमाणावर द्राक्ष, डाळिंब, केळी, ड्रॅगन फ्रूट, कलिंगडे निर्यात केली जातात. सांगली जिल्ह्यातून व्यापारी बागायतदारांकडून फळे खरेदी करून व्यापारी दुबईमार्गे आखाती देशांमध्ये पाठवतात. दुबईला पाठविण्यात पान ७ वर

## ब्रिटानियाकडून कर चोरी? ६.३७ कोटी दंडाची नोटीस

■ नवी दिल्ली

**बिस्किट** निर्मितीमध्ये आघाडीवर असलेल्या ब्रिटानिया इंडस्ट्रीने वस्तुंची अयोग्य वर्गवारी करून कर चुकवला असा आरोप केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (सीजीएसटी) आयुक्तांनी ठेवला असून कंपनीला ६.३७ कोटी रुपयांच्या दंडाची नोटीस बजावली आहे.

कंपनीच्या वतीने शेअर बाजाराला दिलेल्या माहितीनुसार ही नोटीस केंद्रीय जीएसटी आणि केंद्रीय उत्पादन कर आयुक्त, ठाणे यांच्या कार्यालयाने पाठवली आहे. जीएसटी कायद्याच्या कलम ७४ अंतर्गत सन २०२०-२१ ते सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांसाठी ही नोटीस बजावण्यात आली आहे. ब्रिटानिया कंपनीवर २ कोटी १२ लाख ४० हजार रुपये आणि ४ कोटी २४ लाख ८० हजार रुपये असे मिळून एकूण दंडाची मागणी ६ कोटी ३७ लाख २० हजार रुपये आहे. त्यावर वेगळे व्याजही लागू केले जाणार आहे.

## भांडुप बस अपघात आरोपपत्रानुसार चालकाने प्रशिक्षण पूर्ण केले नव्हते

■ मुंबई

**दोन** महिन्यांपूर्वी भांडुप रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या भीषण बेस्ट बस अपघात प्रकरणात मोठा खुलासा उघड झाला. अपघातग्रस्त बस चालवणाऱ्या चालकाचे प्रशिक्षण अपूर्ण असल्याचे पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रातून स्पष्ट झाले. भांडुप पोलिसांनी या प्रकरणी तब्बल ७०४ पानी आरोपपत्र न्यायालयात सादर केले.

२९ डिसेंबर २०२५ रोजी भांडुप रेल्वे स्थानकाजवळ बेस्टच्या 'वेट-लीज' तत्त्वावरील विद्युत वातानुकूलित बसचा भीषण अपघात झाला होता. बसने रस्त्यावरील वाहनांना व पादचाऱ्यांना जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला तर ११ जण गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर चालक संतोष रमेश सावंत (५२) यांनी बस आधीपासून सुरू होती आणि हँडब्रेक सुटल्याने बस अचानक पुढे गेल्याचा दावा केला होता. मात्र पोलीस तपासात इलेक्ट्रिक बस चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षण प्रक्रियेची अधिकृत नोंद अपूर्ण



असल्याची माहिती मिळाली. बेस्ट प्रशासनाने सावंत यांनी एक दिवसाचे प्रशिक्षण घेतल्याचा दावा केला होता. मात्र तपासादरम्यान सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये प्रशिक्षण पूर्ण केल्याच्या यादीवर चालकाची स्वाक्षरीच नसल्याचे आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. त्याचबरोबर बसमधून इलेक्ट्रिक बसकडे बदली केलेल्या चालकांना योग्य प्रशिक्षण न देता सेवा देण्यात आल्याचेही नमूद केले आहे.

## राज्यात ४८,२७८ महिला-मुली वर्षभरात बेपत्ता! विधिमंडळात चर्चा

■ मुंबई

**राज्यात** विधिमंडळ अधिवेशनात आज महाराष्ट्रात महिला आणि अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांच्या गंभीर मुद्द्यावर चर्चा झाली. यावेळी गृहविभागाची जबाबदारी सांभाळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात माहिती सादर केली. त्यानुसार, २०२४ मध्ये राज्यातून ४५,६६२ महिला आणि ११,३१६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या होत्या. तर २०२५ मध्ये ही संख्या वाढून ४८,२७८ महिला आणि १२,११३ अल्पवयीन मुली इतकी झाली आहे. एका वर्षात बेपत्ता महिलांच्या संख्येत २,६१६ तर अल्पवयीन मुलींच्या संख्येत ७९७ ने वाढ झाली आहे. त्यावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या पार्श्वभूमीवर विरोधकांनी सरकारच्या महिला सुरक्षा धोरणांवर प्रश्न उपस्थित केले. काँग्रेस नेते भाई जगताप यांनी सभागृहात आक्रमक पान ७ वर

## खामेनींचे पुत्र मोजताबा यांची इराणच्या सर्वोच्च नेतेपदी निवड



**अमेरिका आणि इस्त्रायलशी सुरू असलेल्या युध्दात मारले गेलेले इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खामेनी यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे पुत्र मोजताबा होसेनी खामेनी यांची इराणचे सर्वोच्च धार्मिक नेतेपदी निवड करण्यात आली आहे. इराणच्या अंतरिम नेतृत्व परिषदेने ही निवड केली.**

■ तेहरान

**इराणवर** ३६ वर्षे राज्य करणारे आयातुल्ला खामेनी २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात मारले गेले. या हल्ल्यात खामेनी यांच्यासह त्यांची कन्या, जावई आणि नात हेदेखील मारले गेले. खामेनी यांच्या पत्नी मान्सौरेह खोजास्तेह बाघेरझादेह या हल्ल्यात गंभीररित्या जखमी झाल्या होत्या. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

आयातुल्ला खामेनी यांच्या पार्थिवावर अद्याप अंत्यसंस्कार करण्यात आलेले नाहीत. शिया पंथी मुस्लिमांचे पवित्र धार्मिक शहर माशाद येथे खामेनी यांच्या पार्थिवावर दफन विधी केले जाणार आहेत. तत्पुर्वी राजधानी तेहरानमध्ये खामेनी यांना जनसमुदायाकडून अखेरची मानवंदना देण्यात येणार आहे. खामेनी यांनी मृत्यूपूर्वी उत्तराधिकारी निश्चित केला नव्हता. त्यामुळे ३ सदस्यांच्या अंतरिम नेतृत्व परिषदेने त्यांचा २ नंबरचा पुत्र मोजताबा खामेनी यांची सर्वोच्च धार्मिक नेतेपदी एकमताने निवड केली.

## भाजपाची तावडे, आठवलेंना संधी शरद पवार पुन्हा राज्यसभेवर जाणार

■ नवी दिल्ली

**राज्यसभेच्या** निवडणुकांसाठी भाजपाने आज उमेदवार यादी जाहीर केली. महाराष्ट्रातून भाजपाने विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते आणि माया इवनाते यांना उमेदवारी दिली आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे.

या यादीत माजी विधान परिषद सदस्य रामराव वडकुते यांचे नाव पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. ते धनगर समाजाचे नेते म्हणून ओळखले जातात. पूर्वी राष्ट्रवादी पान ७ वर

### मविआचे उमेदवार शरद पवार

मविआने आपल्या वाट्याच्या एका जागेसाठी शरद पवार यांचे नाव निश्चित केले आहे. आज सायंकाळी खा. सुप्रिया सुळे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही माहिती दिली.

## राज्यात पशुवैद्यक, पशुधन पर्यवेक्षकांचे आंदोलन सुरू

### १० मार्चला सामूहिक राजीनाम्याची तयारी

■ मुंबई

**राज्यातील** शासकीय पशुवैद्यकीय सेवेतील मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे पशुवैद्यक आणि पशुधन पर्यवेक्षकांनी टप्प्याटप्प्याने राज्यव्यापी आंदोलन सुरू केले आहे. उद्या गुरुवार ५ मार्चला सामूहिक रजा आंदोलन होणार असून १० मार्चला सामूहिक राजीनामे देण्याची तयारी महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने केली आहे.

या संघटनेने २ मार्चपासून टप्प्याटप्प्याने पशुसंवर्धन विभागाच्या धोरणांविरोधात



राज्यव्यापी आंदोलन सुरू केले आहे. संघटनेचा आरोप आहे की अत्यल्प मनुष्यबळावर संपूर्ण व्यवस्था चालवली जात आहे.

एका पशुवैद्यकावर अनेक गावांचा कारभार सोपविला असून आधीच कामाच्या तणावाखाली असलेल्या डॉक्टरांकडून रात्री उशिरापर्यंत तातडीची सेवा देण्याची अपेक्षा ठेवली जात आहे. बदललेली वेळापत्रके आणि वाढलेला प्रशासकीय ताण संघटनेनुसार, शासकीय पशु दवाखान्यांच्या वेळा कोणतेही ठोस कारण नसताना बदलण्यात आल्या आहेत. फील्डवर्कचा भार वाढलेला असतानाही बायोमेट्रिक उपस्थिती सक्तीची करण्यात आली आहे.

# सुरेश गावी निघाला

**मापेलकर म्हणून आमचे एक स्नेही म्हणजे जुने शेजारी कोकणात त्यांच्या गावाला शिमग्या निमित्ताने रवाना झाले. गावाला जाताना सुरेश न चुकता मला सांगून जातो, काही खास कारण नाही, काही सवयी लागून जातात तशातली गत.**

गावी जातोय हे सांगताना सुरेशच्या घशातून एक वेगळाच आवाज येतो म्हणजे आनंदाचा चित्कार असतो, इतक्या वर्षात यात बदल झालेला नाही

तशा या ना त्या कारणाने गावाला त्यांच्या फेऱ्या चालूच असतात. पण शिमग्या निमित्ताने जाणं त्यांचं विशेष असतं. एक तर दारचे आंबे रातांबे काजू फणस मिळतातच

पण आता शिमग्या नंतर त्यांच्या गावचा गावरखा असतो... गावरखा म्हणजे म्हणे त्यांच्यासाठी संपूर्ण गावाची दोन दिवसांची सहल असते.. एक अख्खा दिवस एक अख्खी रात्र गावातले सगळे गावकरी उघड्यावर माळरानावर खेळीमेळीने घालवतात...माळरानावर देवीचं पुरातन देऊळ आहे .. तिथे एक खालचं तळं आणि वरचं तळं आहे..



वरचं तळं देवीचं आहे तिथे ती न्हाते आणि खालचं तळं वाटसरूचं त्याचं पाणी ऐन उन्हाळ्यात आटतं.

त्या तळ्यात मासे आहेत अक्षरशः ते उघड्यावर पडतात एरव्ही मासे पकडायला तासनतास गळ टाकून प्रतिक्षा करावी लागते.. आणि आता सताड तोंड उघडं टाकून मासे जीवाच्या आकांताने टणाटण उड्या मारत असतात..

सुरेश म्हणतो ते बघून एकही जण जिभल्या चाटत नाही उलट प्रत्येकाचं अंत:करण करुणेनं भरून येतं.. आणि मग वर्षानुवर्ष चालत आलेला उत्सव साजरा होतो... चांदण्या रात्री देवीच्या तळ्यातून घडा पाणी घेऊन या तळ्यात ओतलं जातं त्या वेळची गायची गाणी पण खूप कर्णमधूर असतात..

प्रत्येकाच्या घडाभर पाण्याने ते तळं पूर्ण नाही पण माशांना जीवनदान देण्यापुरतं भरून जातं त्यातच पाच मासे पकडून देवीच्या तळ्यात सोडतात.. नशिबाने जर त्यात नर मादी निघाले तर त्याची पैदास देवीच्या तळ्यात होते ते वर्ष मग खूप भरभराटीचं मानलं जातं

तळ्यात पिल्ले दिसली तर त्याचाही एक उत्सव असतो नवीन लग्न झालेले चाकरमानी मग त्या उत्सवाला आवर्जून हजेरी लावतात.

गावरखा झाल्यावरही आठवडाभर कोणी ना कोणी येऊन देवीच्या तळ्यातलं पाणी या वाटसरूच्या तळ्यात घालतच असतं..आणि पाऊस पाणी होई पर्यंत तळं तग धरून राहतं

किती छान वाटतं ऐकून..

**- चं गो**

# महावितरणच्या खासगीकरणाचे धोरण नाही! मुख्यमंत्र्यांची ग्वाही

■ मुंबई

**महावितरण** कंपनीचे खाजगीकरण करण्याचे कोणतेही धोरण नाही. परंतु काळानुसार बदलाच्या अनुषंगाने अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे, नवीकरणीय ऊर्जा वापरावर भर देणे, जास्तीत जास्त ग्राहक सेवा ऑनलाईन उपलब्ध करणे, विजेचा वाढता वापर लक्षात घेऊन पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास करणे अशा प्रकारची अनेक कामे महावितरणमध्ये करण्यात येत आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज मंडळाच्या खाजगीकरणाच्या प्रश्नाला उत्तर देताना विधानसभेत म्हटले आहे.

विधानसभेत वीज मंडळाच्या खाजगीकाराबाबत सतेज पाटील, भाई जगताप यांच्यासह आमदारांनी प्रश्न उपस्थित केला होता. महावितरण कंपनीच्या १३ मंडळ कार्यालयांचे खाजगीकरण होणार असून सदर कार्यालये खाजगी कंपन्यांच्या ताब्यात जाणार असल्याचे खरे आहे काय? असा प्रश्न त्यांनी विचारला होता.

# थकीत भाड्यामुळे ससून डॉकमधील गोदाम सील! नितेश राणेंची माहिती



■ मुंबई

**कुलाबा** येथील ससून डॉक परिसरातील १८ गोदामांपैकी १६ गोदामे थकीत भाडे रकमेच्या कारणामुळे मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी ताब्यात घेऊन सील केली असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिली. या संदर्भात दिंडोशीचे आमदार सुनील प्रभू यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हा खुलासा केला.




मुंबई पोर्ट ट्रस्ट प्राधिकरणाने सुमारे १५० वर्षे जुनी १८ गोदामे पोलीस बंदोबस्तात सक्तीने बंद केल्याच्या निषेधार्थ कोळी बांधवांनी ससून डॉक ते आझाद मैदान दरम्यान मूक मोर्चा काढून आंदोलन केले होते. ही गोदामे महामंडळामार्फत कोळी बांधवांना भाड्याने देण्यात आली होती. कोळी बांधव नियमितपणे महामंडळाकडे भाडे भरत होते. पण महामंडळाने मुंबई पोर्ट ट्रस्ट प्रशासनाकडे भाडे रक्कम जमा न केल्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

या प्रश्नाच्या लेखी उत्तरात मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, ससून डॉकमधील संपूर्ण जागा मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची आहे. १८ गोदामांपैकी गोदाम क्रमांक १५८ आणि १७७३ ही दोन गोदामे महामंडळाकडे होती. ही गोदामे १९७३ साली महाराष्ट्र शासनाने महामंडळाला भाडेतत्त्वावर भाडेकरूंसह हस्तांतरित केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही दोन्ही गोदामे मुंबई पोर्ट ट्रस्टकडे परत करण्यात आली आहेत. तर उर्वरित १६ गोदामे आधीपासूनच मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ताब्यात आहेत. गोदाम क्रमांक १५८ आणि १७७३ संदर्भातील थकीत रकमेपैकी भाडेकरूंनी सुमारे २.७७ कोटी रुपये महामंडळाकडे जमा केले होते. त्यापैकी सेवाशुल्क वजा करून सुमारे २.५४ कोटी रुपये मुंबई पोर्ट ट्रस्टकडे जमा करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधित गोदामे ताब्यात घेऊन सील करण्यात आली आहेत.

# अकृषिक कर आकारणीच्या तरतुदी रद्द मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

■ मुंबई

**राज्यातील** निवासी, वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनीवरील अकृषिक कर आकारणीच्या तरतुदी रद्द करण्यात आल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. खडकवासला मतदारसंघाचे आमदार भिमराव धोंडिया तापकीर यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात त्यांनी हा खुलासा केला. राज्यातील शहरी भागातील गृहनिर्माण संस्थांसाठी अकृषिक कर माफ करण्याचा निर्णय ऑक्टोबर २०२४ मध्ये घेण्यात आला होता. मात्र अद्याप औपचारिक शासन निर्णय जारी न झाल्यामुळे अनेक गृहनिर्माण संस्थांना कर भरण्याबाबत अडचणी येत आहेत. गृहनिर्माण संस्थांच्या करमाफीसंदर्भातील मंत्रिमंडळ निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ करण्यासाठी शासनाने ठोस कालमर्यादा निश्चित केली आहे का, असा प्रश्न आमदार तापकीर यांनी उपस्थित केला होता.

या प्रश्नाच्या लेखी उत्तरात बावनकुळे म्हणाले की, ४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील निवासी, वाणिज्य व औद्योगिक वापराखालील जमिनीवरील संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रशासकीय कारणास्तव त्या निर्णयाचे कायद्यात रुपांतर होऊ शकले नव्हते. यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अकृषिक कर आकारणीच्या तरतुदी रद्द करण्याचा निर्णय पुन्हा घेण्यात आला. त्यानुसार ३१ डिसेंबर २०२५ पासून लागू करण्यात आला आहे.

# कल्याणशेट्टी-भास्कर जाधवांमध्ये लग्नपत्रिका वाटपावरून बाचाबाची

■ मुंबई

**मुंबईत** सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान आज विधिमंडळ परिसरात दोन आमदारांमध्ये बाचाबाची झाली. भाजपाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि उबाठाचे भास्कर जाधव यांच्यात लग्नपत्रिका वाटण्याच्या मुद्यावरून वाद झाला आणि काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.भाजपा आमदार राहुल आवाडे यांची मुलगी सानिका आणि आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांचा मुलगा अजय यांचा विवाह सोहळा १५ मार्च रोजी होणार आहे. त्यानिमित्त आमदारांच्या खासगी सहाय्यकांकडून विधिमंडळ परिसरात लग्नपत्रिकांचे वाटप केले जात होते. यावरूनच दोन्ही आमदारांमध्ये वाद झाला. विधिमंडळ आवारात पत्रिका वाटप होत असल्याने भास्कर जाधव यांनी टीका करत अपशब्द वापरल्याचा आरोप करत सचिन कल्याणशेट्टी आक्रमक झाले. काही हरकत असल्यास तक्रार करा, पण अपशब्द वापरणे योग्य नसल्याचे सांगत जाधवांना सुनावले.

# हृदयशल्यविशारद अनिलकुमारांचे ७५ व्या वाढदिवशीच निधन

■ मुंबई



**प्रसिद्ध** हृदयशल्यविशारद डॉ. अनिलकुमार यांचे आज मुंबईतील वरळी येथील निवासस्थानी निधन झाले. हजारो रुग्णांना नवजीवन देणारे डॉ. अनिलकुमार यांनी आपल्या ७५ व्या वाढदिवशीच जगाचा निरोप घेतल्याने वैद्यकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

आज पहाटे सुमारे ५ वाजता प्रातः विधी आटोपल्यानंतर ते पुन्हा झोपले. सकाळी ८ वाजता त्यांच्या पत्नी त्यांना उठवण्यासाठी गेल्या असता कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने तातडीने डॉक्टरांना बोलावण्यात आले. तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांचे निधन झाल्याचे सांगितले.गेल्या पाच दशकांपासून डॉ. अनिलकुमार वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत होते. हृदयशल्यचिकित्सेमधील अनेक गुंतागुंतीची प्रकरणे त्यांनी यशस्वीरित्या हाताळली होती.

कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्टिंग, हार्ट फेल्युअर, हार्ट ट्रान्सप्लांट, हार्ट व्हॉल्व्ह रिपेअर, हार्ट व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट, पेरिफेरल व्हॅस्क्युलर डिसीज, स्टेंटिंग आणि अँजिओप्लास्टीसारख्या जटिल उपचारांमध्ये त्यांचा विशेष हातखंडा होता. डॉ. अनिलकुमार यांनी नायर रुग्णालय, मुंबई रुग्णालय तसेच जे.जे. रुग्णालयात कार्डिओलॉजिस्ट म्हणून काम केले होते. अलीकडील काळात ते राजकीय क्षेत्रातही सक्रिय होते. दरम्यान, वरळी येथील वैकुंठभूमी विद्युतदाहिनी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अजिंक्यतारा किल्ल्यावरून पडून कामगाराचा मृत्यू

■ सातारा

**जिल्ह्यातील** ऐतिहासिक अजिंक्यतारा किल्ल्याच्या कड्यावरून २०० फूट खोल दरीत पडून कामगाराचा मृत्यू झाला. या मृत कामगाराचे नाव नामदेव रमाजी गबाले (५८) असे असून तो पुणे जिल्ह्यातील मंचर येथील रहिवासी होता. राज्य सरकारने गड संवर्धन मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत अनेक गड-किल्ल्यांवर संवर्धनाची कामे सुरू आहेत. अजिंक्यतारा किल्ल्यावर पुणे जिल्ह्यातील दहा-पंधरा कामगार काम करत आहेत. नामदेव गबाले हा कामगार रात्री कड्यावरून २०० फूट खोल दरीत पडला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ही निदर्शनास आली. दरीत ज्याठिकाणी हा कामगार पडला होता, त्याठिकाणी मोठमोठे दगड असल्याने गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला होता. त्यानंतर शिवेंद्रसिंहराजे ट्रेकर्स अ‍ॅण्ड रेस्क्यू टीमने त्याचा मृतदेह दरीतून बाहेर काढला.

# वसईत भर रस्त्यात वाहतूक पोलिसाच्या हत्येचा प्रयत्न

■ वसई

**एका** दुचाकीस्वाराने बंदोबस्तावर असलेल्या वाहतूक पोलिसाला भर रस्त्यात मारहाण करत डोक्यात दगड घालून हत्येचा प्रयत्न केला. वसईच्या गोखिवरे नाक्यावर दुपारी ही घटना घडली. या हल्ल्यात वाहतूक पोलीस जसवंत वळवी गंभीर जखमी झाले. चार तरुण एकाच दुचाकीवरून येत असल्याने त्यांना पोलिसाने अडवले होते. धुळवड निमित्ताने काल वाहतूक पोलिसांनी शहरात ठिकठिकाणी तपासणी मोहीम सुरू केली होती. वसई वाहतूक विभागाचे सहाय्यक फौजदार जसवंत वळवी (५२) हे वसई पूर्वेच्या गोखिवरे रेंज नाक्यावर बंदोबस्तासाठी होते. त्यांच्यासोबत अन्य एक पोलीस होता. दुपारी साडेतीनच्या सुमारास एका दुचाकीवरून ४ जण जात असलेले वळवी यांना दिसले. त्यामुळे वळवी यांनी ती दुचाकी थांबवली. दुचाकीस्वार अभिषेक जैस्वार (२१) याने वळवी यांच्याशी हुज्जत घातली.

# राज्य मंत्र्याच्या दालनाचे भाडे शिवशाही कार्यालयाला भरावे लागते

■ मुंबई

**वांद्र्याच्या** म्हाडा भवनात गृहनिर्माण राज्य मंत्र्यांचे दालन आहे. या दालनाच्या जागेचे भाडे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाला भरावे लागत आहे.

अधिक माहिती देताना या कार्यालयातून असे सांगण्यात आले की, म्हाडा भवनाच्या पाचव्या मजल्यावरील ७८६३ चौरस फुटाच्या जागेत शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे कार्यालय आहे. शिवशाही म्हाडा प्राधिकरणाला या जागेचे भाडे अदा करते, असे असताना म्हाडाने या जागेत ७२९ चौरस फुटाचे गृहनिर्माण राज्य मंत्र्यासाठी दालन बांधले आहे. मात्र म्हाडा संपूर्ण जागेसह दालनाचे भाडे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाकडून वसूल करते.

म्हाडाने राज्य मंत्र्यांना बसण्यासाठी स्वेच्छेने दालन बांधलेले आहे. मग या दालनाच्या जागेच्या भाड्यात आमच्या कार्यालयाला सूट देण्यात यावी. दालनाच्या जागेचे भाडे आमच्याकडून आकारू नये, असे मत आमचे आहे. यावर काय तो म्हाडाने निर्णय घ्यावा.

# जीएसटी अधिकारी आत्महत्या प्रकरणी मुख्य आरोपी अटकेत

■ बीड

**बीड** येथील वस्तू व सेवा कर विभागाचे अधिकारी सचिन नारायण जाधवर यांच्या आत्महत्या प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपी आणि वरिष्ठ अधिकारी प्रदीप फाटे याला अटक केली आहे. पुणे येथील वाघोली परिसरातून बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. गुन्हा दाखल झाल्यापासून सुमारे ४० दिवसांपासून तो फरार होता.

१६ जानेवारी २०२६ रोजी सचिन जाधवर हे कामावर जात आहे असे सांगून घराबाहेर पडले होते. पण ते परतले नाहीत. दुसऱ्या दिवशी, १७ जानेवारी रोजी मांजरसुंबा घाटातील कपिलधारवाडी फाट्याजवळ त्यांच्या कारमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेनंतर त्यांच्या पत्नी मयुरी जाधवर यांनी वरिष्ठ अधिकारी प्रदीप फाटे यांच्यावर गंभीर आरोप केले. मयुरी जाधवर यांच्या जबाबानंतर २३ जानेवारी रोजी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा नोंद होताच प्रदीप फाटे फरार झाला होता. अटकेपासून बचावासाठी त्याने न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. पण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने तो अर्ज फेटाळला. आरोपी अटकेत येत नसल्याने पोलीस प्रशासनावरही टीकेची झोड उठत होती.


# लोअर परळ येथील भूखंडाच्या लिलावात एकही बोलीदार नाही! मुदतवाढ दिली

**१,३४८ कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित**

■ मुंबई

**लोअर** परळ सारख्या मोक्याच्या ठिकाणी २३,८२२ चौ.मी.च्या भूखंडासाठी मुंबई महापालिकेने केलेल्या लिलावात एकाही बोलीदार न मिळाल्याने लिलावाची मुदत वाढवावी लागली आहे. हा महत्त्वाचा भूखंड १९२७ साली सेंच्युरी स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड यांना भाडेपट्ट्यावर देण्यात आला होता. दीर्घ न्यायालयीन लढाईनंतर मागील वर्षी महापालिकेने हा भूखंड ताब्यात घेतला.

महापालिकेने सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर ३० वर्षांसाठी भूखंड भाडेपट्ट्याने देण्यासाठी निविदा मागवल्या असून, सुमारे १,३४८ कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे. हा भूखंड १ एप्रिल १९२७ ते १९५५ या कालावधीसाठी कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी देण्यात आला होता. ३ ऑक्टोबर १९२८ रोजी भाडेपट्टा करार झाला होता. १९५५ मध्ये मुदत संपल्यानंतर कंपनीने भूखंड परत न करता तो स्वतःच्या नावावर करण्याचा प्रयत्न केला. याविरोधात महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. जानेवारी २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल देत भूखंड हा महापालिकेचाच असल्याचे स्पष्ट केले. महापालिकेच्या मालकीच्या या भूखंडावर सध्या ४७६ घरे, १० दुकाने आणि एक शाळा आहे. जानेवारीमध्ये भूखंड भाडेपट्ट्यावर देण्यासाठी निविदा मागवण्यात आल्या होत्या. मात्र १६ फेब्रुवारीपर्यंत एकही बोली प्राप्त झाली नाही. अनेक कंपन्यांनी रस दाखवला होता. आता अंतिम मुदत १६ मार्चपर्यंत वाढवण्यात आली आहे, असे महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. जून २०२५ मध्ये महापालिकेने क्रॉफर्ड मार्केट आणि वरळी अ‍ॅस्फाल्ट प्लांटजवळील दोन उच्च-मूल्य भूखंडांचा लिलाव करून १,१५२ कोटी रुपये मिळवले होते. मात्र मलबार हिल येथील २,४३२ चौ.मी भूखंडाची विक्री स्थानिक रहिवाशांच्या आक्षेपांमुळे रद्द करण्यात आला. नवीन उपकेंद्रासाठी तो आवश्यक असल्याचे सांगितले जात होते.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# तिसऱ्या मुंबईची पहिली गोष्ट

**संपूर्ण देशभरामध्ये** किंबहुना जगामध्ये नागरीकरणाच्या नव्या लाटा काही दशकांपासून निर्माण होत आहेत. खेडी ही सुद्धा आता शहरं होत आहेत. किंबहुना ग्रामीण भागाचा विकास करण्याकरिता खेड्यांना सामावून घेत नवी मोठी महानगरे तयार करण्याचाही एक नवा प्रकार देशभरामध्ये सुरू आहे. नागरी सुविधा किंवा एकूण देशाच्या विकासामध्ये अधिकाधिक खेड्यांना विकासाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या तर लोकांच्या जीवनमानामध्ये लवकर सुधारणा होते किंवा जीवनस्तर उंचावतो अशा प्रकारचा एक मूलभूत विचार शहर नियोजन करणाऱ्या अभ्यासकांनी मांडलेला आहे. अर्थातच प्राचीन काळापासून ही संकल्पना रूढ झालेली आहे. अधिकाधिक प्रमाणामध्ये खेडी किंवा ज्या ठिकाणी विकास पोहचू शकलेला नाही अशांना विकासाच्या कक्षेत सामावून घेतले जाते आणि तसे केल्याने त्या भागाला मिळणाऱ्या सोयी सुविधा या तिथल्या नागरिकांच्या रोजगाराबरोबरच जीवनमानामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणतात. म्हणूनच भारतात स्मार्ट सिटीची कल्पना आली अर्थात स्मार्ट सिटी हा प्रकार तितकासा यशस्वी झालेला नाही. परंतु भारतातील काही प्रमुख शहरांचा विचार केला तर महानगरांचा विकास हा तितकाच महत्त्वाचा ठरतो. आता तर काही महानगरे इतकी फुगली आहेत तिथे वाढत असलेली लोकसंख्या आणि तिथल्या सोयीसुविधांवर पडत असलेला ताण लक्षात घेऊन त्यालाही पर्यायी शहर किंवा महानगर तयार करण्याची आवश्यकता वाटू लागलेली आहे. अगदी अहमदाबाद, बंगळुरु, कोलकाता यासारख्या शहरांच्या बाबतीत हीच अवस्था पाहायला मिळते. मुंबईसारख्या महानगरासाठी सुद्धा एकेकाळी नवी मुंबई तयार केली गेली होती परंतु आता मुंबई किंवा नवी मुंबई या दोन्ही महानगरांवर पडणारा ताण खूपच वाढला आहे. सतत लोकसंख्याही वाढत असल्याने आता तिसऱ्या मुंबईची संकल्पना प्रत्यक्षात आणली जाते आहे. या तिसऱ्या मुंबईची ही पहिली गोष्ट जर नीट लक्षात घेतली तर त्यातून मुंबई महानगरावर पडणारा ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल अशी अपेक्षा व्यक्त झालेली आहे. जवळपास ३३२ चौरस मीटरच्या क्षेत्रफळात आणि १२४ गावांना अंतर्भूत करून देणारी ही तिसरी मुंबई म्हणजे देशातील सर्वात मोठे आधुनिक आणि पूर्ण विकसित महानगर असेल अशा प्रकारची त्याची रचना किंवा नियोजन सांगितले जाते आहे.

**देशातले सर्वात आधुनिक महानगर**

या पद्धतीने हे महानगर विकसित करत असताना त्या ठिकाणी अधिकाधिक नवनवीन सुविधा देण्यावर भर दिला गेलेला आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने चांगल्या पद्धतीची शिक्षण व्यवस्था चांगल्या पद्धतीची आरोग्यव्यवस्था, क्रीडांगण, मनोरंजनाच्या सोयी सुविधांबरोबरच तंत्रज्ञानाला पूरक अशा प्रकारचे वातावरण निर्माण केले जाणार आहे. बहुतांश आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सगळ्या आवश्यक सोयी सुविधा या ठिकाणी तयार करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. म्हणूनच गेल्या पाच वर्षांमध्ये त्या ठिकाणी एज्युकेशन सिटी नावाचा प्रकार अंमलात आला ज्या ठिकाणी जवळजवळ दहा परदेशी विद्यापीठांना एकाच ठिकाणी विकसित करायला संधी दिली गेली आहे. आता भारतीय तरुणांना उत्तम दर्जाचे शिक्षण घेण्यासाठी परदेशी विद्यापीठांकडे धाव घेण्याची गरज नाही तर त्यांना त्याच विद्यापीठांच्या माध्यमातून भारतातही शिक्षण घेता येईल. जगातील अशी प्रमुख मान्यवर विद्यापीठ या एज्युकेशन सिटीमध्ये स्थापन केली जात आहे. याच पद्धतीने मेडी सिटी म्हणजेच या ठिकाणी उत्तम दर्जाच्या आरोग्यव्यवस्था आणि वैद्यकीय शिक्षणाच्या ही सुविधा देण्याचा प्रयत्न होणार आहे. त्याच्या बरोबरीने भविष्यकाळात येऊ घातलेले आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान याचे आव्हान स्वीकारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाला लागणारे डेटा सेंटर या तिसऱ्या मुंबईत उभे केले जात आहे. देशभरातून जेवढा काही डेटा संकलित केला जातो त्याच्या ६५ टक्के डेटा ह्या तिसऱ्या मुंबईतल्या डेटा सेंटरमध्ये उपलब्ध करून दिला जाणार आहे. नुकतेच स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि त्याला जोडणारी नवीन मेट्रो लाईन जी मुंबईतल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडली जाईल. याला गोल्ड मेट्रो लाईन अशा प्रकारचे नाव दिले गेलेले आहे.

**नवी मुंबईचा अनुभव**

एकूणच अधिकाधिक चांगल्या पद्धतीच्या परिवहन सुविधा आणि तिथे अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण करून मुंबईवरचा ताण कमी करायला प्राधान्य दिले जाणार आहे. सरकारचा हा विचार उत्तम जरी असला तरी नवी मुंबईचा अनुभव लक्षात घेता प्रत्यक्षात मुंबईवरचा ताण कमी करण्यासाठीच नवी मुंबई तयार केली गेली होती. परंतु तिथे देखील त्याच पद्धतीचे वातावरण आज निर्माण झालेले आहे मुंबईवरचा ताण खूप कमी झाला असे काही त्यातून आढळून आलेले नाही. आता या तिसऱ्या मुंबईची नव्याने म्हणजेच तिची पहिल्यापासून चांगल्या पद्धतीची रचना करण्याची कल्पना निश्चितच चांगली जरी असली तरी नवी मुंबईचा अनुभव लक्षात घेतला तर खरोखरच मुंबईवरचा ताण कमी होईल आहे का याची शाश्वती आज तरी देता येत नाही. कारण तिसऱ्या मुंबईमध्ये नव्याने सामावली जाणारी लोकसंख्या ही मुंबईशीसुद्धा जोडलेली राहील. परिवहन किंवा प्रवासाच्या माध्यमातून मुंबईत येणाऱ्यांची संख्या कमी होईल अशी शक्यता दिसत नाही. म्हणूनच पहिली मुंबई, दुसरी मुंबई, तिसरी मुंबई अशा प्रकारे ही शृंखला जरी पुढे चालू राहिली तरी सुद्धा मूळ मुंबईवरचा ताण किंवा इथल्या जनजीवनाला दिलासा मिळेल याची खात्री कोणीही देऊ शकत नाही. म्हणूनच या तिसऱ्या मुंबईची पहिली गोष्ट हीच लक्षात ठेवावी लागेल की मुंबईला त्यातून खरोखर दिलासा मिळणार आहे का?


**सुविचार**

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

जीवनातील पुस्तके आणि लोक दोन्ही वाचायला शिका, कारण ज्ञान पुस्तकांमधून येते आणि अनुभव माणसांकडून येतो.

**पं चां ग**

गुरुवार, ५ मार्च २०२६
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर
* फाल्गुन कृष्ण द्वितीया
नक्षत्र - उत्तरा फाल्गुनी



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कन्या

रवी उदय- ०६-५६
रवी अस्त- १८-४४

संत तुकाराम महाराज बीज-देहू

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## मिक्स व्हेज मसाला भाजी



**साहित्य** :-४ टोमॅटो, २ कांदे, ७-८ लसूण पाकळ्या, १ इंच आले, २ हिरवी वेलची, ४ लवंगा, ८ मिरे ४ दालचिनी तुकडे, मीठ चवी नुसार, पाणी आवश्यक ते नुसार, १/४ कप तेल ३ गाजर, १-१/२ टीस्पून लाल तिखट, २०० ग्रॅम फरसबी शेंगा, १ टेबलस्पून धणे पूड, १ टीस्पून जीरे पूड १ टीस्पून कसुरी मेथी, मूठभर कोथिंबीर, १/२ टीस्पून हळद, १ टीस्पून गरम मसाला, १ पॅक बेबी कॉर्न

**कृती**:-
२५ मिनिटे, १, टोमॅटो चिरून घ्या. कांदे उभे पातळ काप करा, बाकी तयारी करून घ्या. आता कढईत तेल घाला व ते तापले की कांदा सोनेरी रंगावर तळून घ्या. आता मिक्सरच्या भांड्यात टोमॅटो, कांदा तळलेला, लसूण, आले, मिरे, लवंगा, हिरवी वेलची, दालचिनी घालून बारीक पेस्ट वाटून घ्या. आता कांदा तळलेल्या तेलात भाज्या स्टर फ्राय करा व झाल्यावर बाजूला काढा. आता त्या उरलेल्या तेलात, कोरडे जिन्नस जसे, तिखट, मीठ, गरम हळद, मसाला, कसुरी मेथी, धणे पूड, जीरे पूड घालून फ्राय करा, ते मसाले करपू देऊ नये. आता वाटून घेतलेला कांदा टोमॅटो पेस्ट घाला व एकजीव करा. आता झाकण ठेवा व शिजवून घ्या तेल सुटेपर्यंत. आता पाणी घालून घ्या थोडे व त्यात भाज्या घाला. सगळे एकजीव करा आणि त्यात कोथिंबीर घाला व झाकण ठेवून एक वाफ काढा.




# आज टी-२० विश्वचषकाचा दुसरा उपांत्य सामना

## वानखेडेवर भारत आणि इंग्लंड आमनेसामने

**मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर उद्या होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारत आणि इंग्लंड आमनेसामने येणार आहेत. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धडक मारण्यासाठी दोन्ही संघांचे खेळाडू सज्ज झाले. त्यासाठी या खेळाडूंनी आज वानखेडे स्टेडियमवर कसून सराव केला. या उपांत्य सामन्यातील लढत अत्यंत चुरशीची ठरणार आहे.**



■ मुंबई

**इंग्लंडचा** कर्णधार हॅरी ब्रूक जबरदस्त फार्मात आहे. या स्पर्धेत त्याने सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. त्याने १ शतक आणि १ अर्धशतकासह एकूण २२८ धावा केल्या आहेत. डाव सावरण्याची क्षमता आणि दबावात शांत खेळ ही त्याची ताकद आहे. त्याला रोखणे भारतीय गोलंदाजांसाठी आव्हान असणार आहे. इंग्लंडच्या आदिल रशीदने ७ सामन्यांत ११ विकेट घेतल्या असून त्याची इकॉनॉमी ८ पेक्षा कमी आहे. मधल्या षटकांत धावा रोखण्यासहच विकेट घेण्याची क्षमता त्याच्यात आहे. भारतीय मधल्या फळीसमोर त्याची फिरकी मोठे आव्हान उभे करू शकते. या स्पर्धेत भारत आणि इंग्लंड यांची कामगिरी सारखीच राहिली. दोन्ही संघांनी ७-७ सामने खेळले.यात दोन्ही संघांचा एकदा पराभव झाला आहे. भारत ग्रुप स्टेजमध्ये पहिल्या स्थानावर होता. तर इंग्लंड सुपर ८ च्या ग्रुप २ मध्ये पहिल्या स्थानावर होता. भारताने आतापर्यंत तीन वेळा टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. त्यापैकी दोन वेळा विजेतेपद पटकावले. इंग्लंडनेही ३ अंतिम सामन्यापैकी दोन वेळा विजेतेपद जिंकले. वानखेडे स्टेडियमवर भारताने आतापर्यंत ७ टी-२० सामने खेळले. त्यापैकी ५ सामने भारताने जिंकले,तर दोन सामन्यांत पराभव स्वीकारावा लागला. या मैदानावर भारताची सर्वात मोठी धावसंख्या ९ बाद २४७ अशी आहे. हा विक्रम इंग्लंडविरुद्ध २ फेब्रुवारी २०२६ चा आहे. तर सर्वात कमी धावसंख्या अमेरिकेविरुद्ध ९ बाद १६१ आहे, हा सामना ७ फेब्रुवारी २०२६ रोजी झाला होता.

## मुलुंड क्रीडा केंद्र कबड्डी स्पर्धेत स्वराज्य स्पोर्ट्स,स्वस्तिक मंडळ अजिंक्य

■ मुंबई

**मुलुंड** (पूर्व) येथील छत्रपती संभाजी राजे मैदानात मुलुंड क्रीडा केंद्रातर्फे आयोजित कबड्डी महोत्सवात महिला गटात कांजूरमार्ग येथील स्वराज्य स्पोर्ट्सने आणि पुरुष गटात कुर्ला येथील स्वस्तिक क्रीडा मंडळाने जेतेपदाचा मान मिळवला.
महिला गटातील अंतिम सामन्यात स्वराज्य स्पोर्ट्स (कांजूरमार्ग) यांनी उत्कृष्ट खेळ करत आरंभ स्पोर्ट्स (मालाड) संघावर ३६-२२ असा विजय मिळवत अजिंक्यपद पटकावले. संपूर्ण सामन्यात स्वराज्य संघाने आक्रमक चढाया आणि भक्कम बचाव यामुळे आघाडी कायम राखली. पुरुष गटातील अंतिम सामन्यात स्वस्तिक क्रीडा मंडळ (कुर्ला) `--- यांनी दमदार खेळ करत चेंबूर क्रीडा केंद्र संघावर २६-१४ असा सहज विजय मिळवत विजेतेपद पटकावले.

## न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात प्रवेश दक्षिण आफ्रिका ९ विकेटने पराभूत

**कोलकाता** - सामनावीर फिन ॲलनच्या ३३ चेंडूंत नाबाद १०० धावांच्या जोरावर आज न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला ९ विकेटने सहज पराभूत करुन टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश मिळविला. ईडन गार्डनवर झालेल्या या स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेने १६९ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात न्यूझीलंडने १२.५ षटकांत १ बाद १७३ धावा केल्या. फिन ॲलन सामनावीर ठरला. १६९ धावसंख्येचा पाठलाग करताना टिम सेफर्ट आणि फिन ॲलन यांनी सुरुवातीपासूनच चौकार आणि षटकार ठोकून दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांचा चांगलाच धुव्वा उडवला. या जोडीने ९ षटकांत ११७ धावा केल्यामुळे हा सामना न्यूझीलंडच्या बाजूने झुकला. टिम सेफर्ट ३३ चेंडूंत ५८ धावा करुन बाद झाला. रचिन रवींद्रने फिन ॲलनला शेवटपर्यंत उत्तम साथ दिली. फिन ॲलन ३३ चेंडूंत १०० धावा करुन नाबाद राहिला आणि न्यूझीलंडला १२.५ षटकांत विजयी आकडा गाठून दिला.

## शिवशंकर उत्सव मंडळाची १३ ते १५ मार्च कॅरम स्पर्धा

■ मुंबई

**शिवशंकर** उत्सव मंडळाच्या वतीने आणि महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने श्रमिक जिमखाना,ना.म. जोशी मार्ग,मुंबई येथे १३ ते १५ मार्चदरम्यान राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मंडळाच्या वतीने दुसऱ्यांदा कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली असून पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटांमध्ये स्पर्धा रंगणार आहेत. या स्पर्धेतील पहिल्या ८ विजेत्यांना मिळून १ लाख १० हजारांची रोख बक्षिसे व चषक देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या www.maharashtracarromassociation.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले. ६ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ८ दरम्यान महाराष्ट्र कॅरम असोसिएशन,पारेख महल बिल्डिंग,सखाराम कीर मार्ग,आश्रय हॉटेलच्या मागे,राजाराणी चौक जवळ,शिवाजी पार्क येथे मुंबईतील खेळाडूंची नावे क्लब मार्फत स्वीकारली जातील.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

ई-निविदा सुचना क्र.:- का. अ. (शहर)/ मुं.झो.सु.मंडळ / ई-निविदा/०५/ २५ - २६
(२ री बोली)

कार्यकारी अभियंता (शहर) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४८४) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण **०१** कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत ई निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर **http://mahatenders.gov.in** वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक ०९.०३.२०२६ दुपारी १.०० पासून दिनांक १६.०३.२०२६ सायंकाळी १५.०० पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त **http://mahatenders.gov.in** संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर), मुं. झो. सु. मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO /A/174
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
क्र. उप.प्र. अभि./यांववि/3664/पू.उप., दि. ०४ मार्च २०२६
ई-निविदा सुचना

| | |
|---|---|
| ई-निविदा क्र. | 2026_MCGM_1282566_1 |
| विषय | टी विभागातील मुलुंड अग्निशमन केंद्र, मुलुंड (प.) येथे स्लायडींग ग्रील चे गेट व एल.बी.एस.चेक नाका मुलुंड (प.) येथे शेडची उभारणी करणेबाबत. |
| निविदा विक्री | निविदा प्रारंभ दिनांक : 05.03.2026 वेळ : 11.00 वा.<br>निविदा समाप्ती दिनांक : 11.03.2026 वेळ : 16.00 वा. |
| संकेतस्थळ | www.mahatenders.gov.in |
| अ) संपर्क अधिकाऱ्याचे नाव | श्रीम. स्मिता अ. तोडणकर |
| ब) मोबाईल क्र. | 8291715782 |
| क) ई-मेल पत्ता | aees03.me@mcgm.gov.in |

सही/-
(श्रीम. रुपाली संकेत कदम)
कार्य.अभि.(यांववि)पू.उप.।

पीआरओ/३१७६/जाही/२०२५-२६

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

**जाहीर सूचना**

**नोंद घ्यावी की,** आमचे अशील निम्न उल्लेखित मालमत्ता **सौ. मीरा प्रकाश चौहान** यांच्याकडून खरेदी करण्यास इच्छुक आहेत, आणि पुढे करारपत्र किंवा विक्री करारनामा बनविण्यापूर्वी खालील अनुसूचीमध्ये उल्लेखित मालमत्तेच्या संदर्भातील शीर्षक आणि मालकी हक्काची तपासणी करण्यास इच्छुक आहेत.
अनुसूचीमध्ये उल्लेखित सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात, कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध, हस्तांतरणास आक्षेप, काहीही असणाऱ्या किंवा तसा दावा असणाऱ्या किंवा हस्तांतरण, अभिहस्तांतरण, हिस्सा, विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, भाडे खरेदी करारपत्र, प्रभार, भेट, भाडेपट्टी, न्यास, ताबा, वारसा, धारणाधिकार, परवाना, वहिवाट, मृत्युपत्र, न्यायालय किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही आदेश, निवाडा किंवा हुकुमाद्वारे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणताही हक्क असणाऱ्या कोणत्याही/सर्व व्यक्तींनी त्याबाबत दाव्याच्या समर्थनार्थ असलेल्या सर्व दस्तऐवजांच्या नोटरीकृत सत्य प्रतिंसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांच्या कार्यालयात सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून **चौदा (१४)** दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करण्याची विनंती आहे. असे न केल्यास असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध, जर असल्यास, सोडून दिला आणि/किंवा त्याग केला असे समजण्यात येईल.
**मालमत्तेची अनुसूची:** ऑफ लिंकिंग रोड, सरस्वती कॉलनी, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई - ४०००५४ येथे स्थित महसूल गाव-वांद्रेच्या टीपीएस-II (अंतिम) चा भूखंड क्र. ८२/३७ आणि ८२/३८ सीटीएस क्र. जी/३४२ आणि जी/३४३ वर बांधलेल्या रिट्रीट-II को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या **"रिट्रीट-II" या इमारतीमधील ८ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ८बी** मोजमाप ११७० चौ.फू. सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ, तसेच एक खुल्या कार पार्किंगच्या वापराचे अनन्य अधिकार व त्यासह भाग प्रमाणपत्र १६ अंतर्गत डिस्टिंक्टिव्ह क्र. ७६ ते ८० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या रु. ५०/- प्रत्येकी चे पाच पूर्णतः भरणा केलेले समभाग.
दिनांक ५ मार्च, २०२६.
**सही/-**
**लॉयलिस्ट असोसिएट्स**
**ॲडव्होकेट्स, उच्च न्यायालय,**
कार्यालय क्र. १७, ३ रा मजला, हाय-लाईफ मॉल, पी. एम. रोड, रेल्वे स्टेशनजवळ, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई-४०००५४.
दूर. क्र.: ३५९७२३१६, मोबा.: ९८९२४२९८९२.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-Tender Notice**

**Turnkey Contract for Power Evacuation Works from EHV substation under Various Districts under 'EHV POWER EVACUATION PHASE V' Scheme**

The Chief Engineer (Distribution), Prakashgad, Mumbai wishes the Bids from eligible bidders for Supply, Erection, Transport , construction , Testing & Commissioning of various Infrastructure Development works under Various Zones of MSEDCL, Maharashtra through **e-tendering website of MSEDCL,** duly super scribing with tender No., due date and opening date & time as follows:

| Tender No. | Zone | Tender Cost (Rs. Crore) | * Tender Fees (Rs.) |
|---|---|---|---|
| CE (Dist)/M-III/Power Evacu./25-26 /T-05 | Nagpur | 62.7279 | 29,500/- |

* Tender Fee (including 18% GST) is to be paid by e-payment only, directly through net banking to MAHADISCOM account.
- Availability of bid documents on website 04-03-2026
- Date and time of sale of bid documents 04-03-2026 at 00.10 Hrs.
- Date and time of Pre-bid Meeting 16-03-2026 at 15:00 Hrs.
- Date & time of Bid Submission 24-03-2026 up to 17.00 Hrs.
- Date and time of opening of technical bids 25-03-2026 at 15.00 Hrs.

This notice is general intimation for the interested Bidders. The details of the tenders are available on MSEDCL's e-tendering Website https://etender.mahadiscom.in/eatApp/.
The Agencies are requested to visit our Website to register themselves for e-Tenders. Memorandum / corrigendum etc. will not be published in the newspaper.

Sd/-
Chief Engineer (Distribution)
MSEDCL, Mumbai

HO PR No. 65/26 Dt. 27.02.2026

**काय होईल, जर लाखो भारतीय, जे तीनचाकी टेम्पो चालवून आपली उपजीविका करतात, त्यांना स्वयंचलित वातानुकूलित कारांशी स्पर्धा करावी लागली तर? गेल्या आठवड्यात मी पूर्णपणे वेगळ्या जगाचा अनुभव घेतला. कामानिमित्त मी नवी दिल्लीमध्ये होतो. नेहमीप्रमाणे शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायचे असल्याने टॅक्सीने जाणे स्वाभाविक होते-एक वातानुकूलित टॅक्सी. हा उष्ण देश आहे. वातानुकूलित कार म्हणजे काचेच्या आत बंद असलेली छोटी, आरामदायी दुनिया वाटते. बाहेर हवामान कसेही असले तरी आत थंडावा आणि सुखद वातावरण असते. दिल्लीला कामानिमित्त येणारे माझ्यासारखे बहुतेक लोक हाच पर्याय निवडतात. मात्र त्या दिवशी रस्त्यांवर नेहमीपेक्षा अधिक गर्दी होती. परिषद आयोजकांनी काही प्रमाणात स्वतःलाच दोष दिला. वाहनांची संख्या कमी करण्यासाठी पोलिसांनी काही रस्ते बंद केले होते. मला वाटले, चालत जाणेच अधिक योग्य.**

# मुंग्यांच्या वारुळावर पाय

■ क्वेतील स्तालेसेन

**नवी** दिल्लीतील सकाळच्या गर्दीत चालणे हा एक वेगळाच अनुभव आहे. जीवन वेगवान आहे; वास आणि गोंगाट भरपूर-विशेषतः आमच्यासारख्या शांत, छोट्या नॉर्वेजियन शहरांच्या जीवनाची सवय असलेल्या लोकांसाठी.

परिषद कृत्रिम बुद्धिमत्तेबद्दल होती. त्याबद्दल मी पुढे लिहीन. आपण कृत्रिम बुद्धिमत्तेबद्दल बोलतो तेव्हा आपण बहुतेक वेळा भविष्याची कल्पना करतो. परंतु येथे उभा राहून मला जाणवले-भविष्य तर आधीच आले आहे.

देश आधीच बदलला आहे. बावीस वर्षांपूर्वी भारत पूर्णपणे वेगळा होता.

रस्त्यांपासून सुरुवात करूया. प्रत्येक दिशेला प्रचंड गर्दी आहे आणि वाहनांची घनता वाढत आहे. जवळपास




प्रत्येक गोष्टीची स्वतःची गती आहे. माझ्या मते, येथे बस आता विजेवर चालायला हव्यात. खासगी कारही बॅटरीवर चालू शकतात. वायू-गुणवत्तेकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

संस्कृतीही बदलली आहे. बावीस वर्षांपूर्वी मी भारतातील इंग्रजी वृत्तपत्रात पीडीए हा शब्द वाचला होता. मला वाटले त्याचा अर्थ वैयक्तिक डिजिटल सहाय्यक असा असेल; परंतु भारतात त्याचा अर्थ सार्वजनिक प्रेमप्रदर्शन असा घेतला जात होता-म्हणजे युवक-युवती हातात हात घालून चालणे, एकमेकांना मिठी मारणे किंवा चुंबन घेणे. अशा चर्चा आता भारतात क्वचितच दिसतात. आता ते येथे अधिक स्वाभाविक झाले आहे. तरुण अधिक मोकळे आहेत; त्यांच्या हातात स्मार्टफोन आहेत.

पूर्वी तरुणी पारंपरिक पोशाखात दिसत असत (किंवा पूर्णपणे झाकलेल्या असत). मोठे, झुलणारे, चमकदार सोन्याचे दागिने-प्रत्येक इंच कपड्यांनी झाकलेला. तो काळ सुपारी आणि तंबाखू चघळणे सामान्य असण्याचा होता-जसा ओस्लोच्या उपनगरांमध्ये धूम्रपानाच्या आधी आणि नंतर दिसणारा बदल.

ही क्रांती केवळ एखादी गोष्ट नाही; ती येथील लोकांच्या जीवनाचा भाग बनली आहे. संस्कृती बदलणे सोपे नसते, पण येथे ते घडले आहे.

आयटी उद्योग जगातील सर्वात मोठ्या उद्योगांपैकी एक बनला आहे. शेकडो हजारो लोकांना पहिली स्थिर नोकरी याच उद्योगातून मिळाली. एक मध्यमवर्ग तयार झाला आहे, जो उपभोग करू शकतो. ही मोठी झेप आहे. आता लोक स्मार्टफोनद्वारे पैसे देतात.

परंपरांना आव्हान दिले जात आहे. महत्त्वाकांक्षा प्रचंड आहेत.भारत प्रगती करत आहे, हे स्पष्ट आहे. आता केवळ साध्या आयटी सेवा नाहीत, तर प्रगत तांत्रिक सेवा-अगदी कृत्रिम बुद्धिमत्ताही-भारतामध्ये पोहोचली आहे. जे प्रगत विचार आधीपासून फिरत होते, त्यांनी नवी दिशा घेतली आहे. मी भेटलेल्या हजारो लोकांच्या नोकऱ्यांमध्ये बदल झाले आहेत.

रस्त्यांवर प्रचंड दबाव आहे-बस, वाहतूक, अव्यवस्था, कार, मोटारसायकली, सायकली, रिक्षा-विविध रंग. अनेकजण माल वाहतूक करताना, अनेकजण कामावर जाताना दिसतात.

पण तंत्रज्ञानाने खरोखरच ते केले, जे शक्यता म्हणून सांगितले जात आहे, तर या लोकांचे काय होईल?

आज जे लाखो भारतीय तीनचाकी टेम्पोने प्रवासी वाहतूक करतात, त्यांना जर वातानुकूलित चालकविरहित कारांशी किमतीत स्पर्धा करावी लागली तर? मोटारसायकल किंवा सायकलने पोहोचवला जाणारा माल ड्रोनने पोहोचवला तर? दुकानदारांचे कर्मचारी रोबोटांनी बदलले, जे माणसापेक्षा स्वस्त आणि अधिक कार्यक्षम असतील तर? जगभरातील लोक विचार करत आहेत की कामगार बाजारात काय होणार आहे. नवे तंत्रज्ञान बदल घडवते, हे ज्ञात आहे. पण नॉर्वेमध्ये आम्ही अजूनही सुरक्षित क्षेत्रात आहोत. आमचे उत्पन्न आणि संसाधने आम्हाला संरक्षण देतात; तर इतर देशांत कामगार क्षेत्र अधिक गुंतागुंतीचे आहे.

जर एखाद्या देशात अचानक मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी निर्माण झाली, तर तो देश स्थिर राहणार नाही. आंदोलने होतील-आणि ती हिंसकही होऊ शकतात.

आपण म्हणतो की आयुष्यभर शिकत राहिले पाहिजे-हे बरोबर आहे. पण प्रत्येकजण आयटी तज्ञ बनू शकत नाही. याला निराशावाद समजू नका. कोणीही उद्या आपली नोकरी हिरावून घेणार नाही; आपण उद्याही कामावर जाऊ. परंतु यावर विचार करणे आवश्यक आहे.

नॉर्वेमध्ये आम्हाला परिश्रमाचे फळ मिळते. पण जगात अब्जावधी लोक अत्यंत कठोर श्रम करतात-आणि ते काम नाहीसेही होऊ शकते. मागील औद्योगिक क्रांतीतही अनेक लोक मागे पडले, जरी त्याच वेळी नवी नोकऱ्या निर्माण झाल्या. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्रांतीत एकाधिकारसदृश प्रवृत्ती निर्माण होऊ शकते, ज्याचा फायदा कदाचित मोजक्या लोकांनाच होईल. सावधपणे पावले टाकावी लागतील. एक चूक झाली, तर आपला पाय मुंग्यांच्या वारुळावर पडेल.

## देश विदेश

# उत्तर प्रदेशमध्ये होळीसाठी पोलिसांनी मशिदी झाकल्या

■ लखनौ

**धार्मिकदृष्ट्या** अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशमध्ये आज होळी सणानिमित्त कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.शाहजहानपूर, संभल, बिजनौर आणि धामपूर यांसारख्या संवेदनशील जिल्ह्यांमध्ये होळीनिमित्त काढल्या जाणाऱ्या मिरवणुकांच्या मार्गातील मशिदी पोलीसांनी मोठ मोठ्या ताडपत्र्या लावून झाकल्या.

मशिदींवर रंग किंवा गुलाल फेकला जाऊ नये, यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून मशिदी झाकण्याचा निर्णय घेण्यात आला ,कोणत्याही कारणाने सामाजिक सलोख्याला तडा जाऊ नये, हा या निर्णयामागील उद्देश आहे, असे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले.

शहाजहानपूर जिल्ह्यात सुमारे ९२ मशिदी येथे लोकप्रिय असलेल्या 'लाट साहब' किंवा 'जुता मार होली'च्या मार्गात येत असल्याने त्या मशिदी झाकण्यात आल्या. मशिदींबरोबरच विजेचे ट्रान्स्फॉर्मर आणि विजेचे खांबदेखील ताडपत्र्या लावून झाकण्यात आल्या होत्या. संभल जिल्ह्यात १० मशिदी झाकण्यात आल्या.

# चीनच्या ६ जी तंत्रज्ञानाला टक्कर इंडो-पॅसिफिक देशांची एकजूट

■ बार्सिलोना

**चीनच्या** वेगाने विकसित होत असलेल्या ६ जी वायरलेस तंत्रज्ञानाला प्रतिस्पर्धी पर्याय उभा करण्यासाठी इंडो-पॅसिफिक मधील देश एकत्र आले आहे. यामध्ये युनायटेड किंग्डम, अमेरिका, कॅनडा, जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांचा समावेश आहे. ग्लोबल कोएलिशन ऑन टेलिकॉम्सने स्पेनमधील बार्सिलोना येथे आयोजित मोबाइल वर्ल्ड काँग्रेसदरम्यान ६ जी नेटवर्कसाठी सुरक्षा आणि लवचिकतेची तत्त्वे जाहीर केली. या तत्त्वांमध्ये सायबर हल्ल्यांपासून संरक्षण, डेटा गोपनीयता, पुरवठा साखळी विविधीकरण, एआय आधारित नेटवर्क सुरक्षाव्यवस्था तसेच क्वांटम-प्रतिरोधक एन्क्रिप्शन प्रणाली विकसित करण्यावर भर दिला आहे. भविष्यात संशोधक, दूरसंचार कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय मानक संस्थांवर प्रभाव टाकणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट मानले जात आहे.

# बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री? नितीश कुमार राज्यसभेवर जाणार

■ पटणा

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना राज्यसभेवर पाठवण्याबाबत जेडीयूमध्ये गांभार्याने चर्चा सुरू आहे.तसे झाल्यास बिहार मुख्यमंत्रिपदी भाजपाला संधी मिळू शकेल, असे सांगितले जात आहे. बिहारमधील सत्ताधारी आघाडीतील सर्वात मोठा पक्ष भाजपाच आहे. त्या अधिकाराने भाजपा मुख्यमंत्रिपदावर दावा करू शकेल.या संभाव्य बदलाच्या चर्चेमुळे राज्याच्या राजकारणाला एक नवे वळण लागण्याची शक्यता आहे. सध्या जेडीयू आणि भाजपाच्या वरिष्ठ पातळीवरील नेत्यांमध्ये या संभाव्य घडामोडीबाबत चर्चा सुरू आहे. राजकीय जाणकारांचे असे म्हणणे आहे की, नितीश कुमार यांना जर केंद्रात मोठी जबाबदारी दिली केली तर त्या बदल्यात भाजपा बिहारच्या मुख्यमंत्रिपदावर हक्काने दावा सांगू शकेल.

# १३५ वर्षे जुन्या मॉस रोझ फुटबॉल स्टेडियमला आग

**लंडन** - इंग्लंडमधील मॅकल्सफील्ड येथील १३५ वर्षे जुन्या मॉस रोझ स्टेडियमला पहाटे आग लागली. आगीची माहिती मिळताच चेशायर अग्निशमन दलाचे दोन बंब ताबडतोब पाठवले. त्यांनी आग आटोक्यात आणली.

मॅकल्सफील्ड एफसीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आपत्कालीन सेवांनी घटनास्थळी ताबडतोब प्रतिसाद दिला आणि आग आटोक्यात आणली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग लागण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. १८९१ पासून मॉस रोझ स्टेडियम हे इंग्लंडमधील सर्वात जुन्या फुटबॉल स्टेडियमपैकी एक आहे. या स्टेडियममध्ये नुकताच २४ फेब्रुवारी रोजी शेवटचा सामना पार पडला. यात मॅकल्सफील्डला फिल्डेविरुद्ध ४-१ असा पराभव पत्करावा लागला.

# ज्येष्ठ अभिनेते विजय कृष्णा यांचे निधन

■ मुंबई

**बॉलिवूडमधील** अभिनेते आणि गोदरेज समूहाचे माजी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर विजय कृष्णा यांचे आज वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाल्यामुळे बॉलिवूडमध्ये शोककळा पसरली.त्यांनी २५ वर्षांहून अधिक काळ अभिनय क्षेत्रात काम केले.

वैयक्तिक आयुष्यात त्यांच्या पश्चात पत्नी स्मिता कृष्णा आणि मुलगी नायरिका होळकर असा परिवार आहे. त्यांच्या निधनानंतर अभिनेत्री लिलेट दुबे यांनी सोशल मीडियावर शोक व्यक्त केला असून अनेक चाहत्यांनीही त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. संजय लीला भन्साली दिग्दर्शित देवदास या चित्रपटात त्यांनी शाहरुख खान यांच्या ऑन-स्क्रीन वडिलांची भूमिका साकारली होती. याशिवाय विजय कृष्णा यांनी डान्स लाइक ए मॅन या चित्रपटातही महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती.

## क्रीडा संकुलांचे उद्घाटन
# शहा गुजरात दौऱ्यावर

■ अहमदाबाद

**केंद्रीय** गृहमंत्री अमित शहा येत्या ७ आणि ८ मार्च रोजी अहमदाबाद दौऱ्यावर जाणार आहेत. ७ मार्चच्या सायंकाळी शहरात ते शहरात पोहचणार असून ८ मार्च रोजी वस्त्राल येथे ६१.६७ कोटी रुपयांच्या खर्चाने उभारण्यात आलेल्या क्रीडा संकुलाचे उद्घाटन अमित शहा करतील. खारी कट कालवा पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पणही त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
विद्युत विभाग
फेरनिविदा-२
निविदा सूचना क्रमांक: ठा.म.पा./विद्युत/नि.सू/९०/२०२५-२६

ठा.म.पा./पी.आर.ओ./जाहिरात/११२७/२०२५-२६ दि.०५/०२/२०२६ अन्वये फेरनिविदा क्र.१ प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा सुचनेतील काम माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत नागरी संशोधन केंद्र येथील वातानुकुलीन यंत्रणेचे नूतनीकरण करणे या कामी द्वितीय फेरनिविदा मागविणेत येत आहे. सदर फेरनिविदा ई टेंडरींग पध्दतीने दिनांक ०५/०३/०२६ ते दि १२/०३/०२६ या कालावधीत मागविण्यात येत आहे. निविदा ई टेंडरींग पध्दतीने https://mahatenders.gov.in वर दि. १२/०३/०२६ पर्यंत दुपारी ३.०० या वेळेत स्विकारण्यात येतील व निविदा दि. १२/०३/०२६ रोजी दुपारी ३.३० या वेळेत उघडण्यात येतील. निविदेतील इतर अटी शर्थी मूळ निविदा सुचना प्रमाणे राहतील.
ठामपा/पिआरओ/विद्युत-मा.मा-प्र.स/१२५४/२०२५-२६ **सही/-**
दि:०४.०३.२०२६ उपनगर अभियंता
**Pls visit our official web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
**जाहिरात एजन्सी निवड**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित अर्थात महावितरणने वृत्तपत्रांना डीजीआयपीआर / डीएव्हीपी दराने जाहिराती देण्यासाठी वर्ष २०२६-२७ करिता जाहिरात एजन्सीची नियुक्ती करण्याचे ठरविले आहे. मुंबई मुख्यालय येथे नियुक्त करण्यात येणाऱ्या या एजन्सीच्या मार्फत मुंबई मुख्यालय, भांडुप परिमंडल, कल्याण परिमंडल,नाशिक परिमंडल, जळगाव परिमंडल व रत्नागिरी परिमंडल, अंतर्गत येणाऱ्या कार्यालयातील जाहिराती प्रकाशित करण्यात येतील. जाहिरात एजन्सी साठी पात्रता व अधिकचा तपशील महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळ **www.mahadiscom.in** व **https://etender.mahadiscom.in/eatApp/** यावर उपलब्ध आहे.
**मुख्य जनसंपर्क अधिकारी**, महावितरण,मुंबई

**मॅक्स फ्लेक्स ॲण्ड इमेजिंग सिस्टीम्स लि.**
**(परिसमापनामध्ये)**
**सीआयएन: U92112MH2002PLC137690**
मॅक्स फ्लेक्स ॲण्ड इमेजिंग सिस्टीम्स लि.च्या मालमत्तांच्या विक्रीकरिता दि. २७.०२.२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या ई-लिलाव सूचनेच्या संदर्भात हे प्रसिद्ध करण्यात येत आहे. पात्रता दस्तऐवज, इतर अर्ज आणि ईएमडी सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक १६.०३.२०२६ (पूर्वीचा दि. १३.०३.२०२६) पर्यंत वाढविण्यात आला आहे. सुधारित ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजाकरिता, कृपया https://ibbi.baanknet.com येथे भेट द्यावी.
सही/-
सीए फणेंद्र एच मुनोत
परिसमापक
मॅक्स फ्लेक्स ॲण्ड इमेजिंग सिस्टीम्स लिमिटेडच्या प्रकरणामध्ये
IBBI/IPA-001/IP-P00515/2017-18/10916
दिनांक: ०५.०३.२०२६ एएफए वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत
ठिकाण: मुंबई प्रक्रिया ईमेल आयडी: liquidation.maxflex@gmail.com

**दिंडोशी, मुंबई येथील**
**नगर दिवाणी न्यायालयामध्ये**
**संकीर्ण अर्ज क्र. २९ वर्ष २०१७**
**मे. प्रभात टेलिकॉम्स इंडिया लि. ... अर्जदार**
**विरुद्ध**
**उज्ज्वल बागुल ... प्रतिवादी**
**न्यायालयीन कायदेशीर सूचना**
नोंद घ्यावी की, उपरोल्लेखित संकीर्ण अर्ज माननीय नगर दिवाणी न्यायालय, दिंडोशी, मुंबई यांच्यासमक्ष प्रलंबित आहे.
प्रतिवादी श्री. उज्ज्वल बागुल यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, वरील प्रकरणातील समन्स सामान्य पद्धतीने तुमच्यावर बजावण्यात येऊ शकले नाही कारण ते तात्पुरत्या कॅम्पसाईटमध्ये राहतात आणि त्यांना शोधणे कठीण आहे.
सदर माननीय न्यायालयाद्वारे पारित दिनांक २४.११.२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे, दिवाणी प्रक्रिया, १९०८ च्या संकेताच्या आदेश ५ नियम २० अन्वये अर्जदारास वृत्तपत्र प्रसिद्धीद्वारे प्रतिवादीस समन्स देण्याची परवानगी देण्यात आली आहे.
प्रतिवादींना याद्वारे सांगण्यात येते की, या माननीय न्यायालयासमक्ष दि. १८.०७.२०२६ रोजी पुढील सुनावणीच्या दिनांकास उपस्थित रहावे, असे न केल्यास प्रकरणाची कोणत्याही पुढील संदर्भाशिवाय तुमच्या अनुपस्थितीमध्ये तुमच्या विरुद्ध प्रक्रिया सुरु करण्यात येईल.
सही/-
ठिकाण: मुंबई अर्जदाराकरिता ॲडव्होकेट
दिनांक: ०४.०३.२०२६ **जीत जे गांधी**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**राजशिष्टाचार व जनसंपर्क विभाग**
**अल्प ई-निविदा सुचना क्रमांक ४ सन २०२५-२६**
नाशिक महानगरपालिकेच्या राजशिष्टाचार व जनसंपर्क विभागातील ई-निविदेद्वारे ई-निविदा सुचना क्रमांक ४ सन २०२५- २६ स्पर्धात्मक देकार मागविण्यात येत आहे. ईच्छूक निविदाधारकांनी सविस्तर माहितीसाठी http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.
सदरची ई-निविदा ऑनलाईनद्वारे दिनांक ०५/०३/२०२६ ते ११/०३/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
टिप - यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online Website वर प्रसिध्द करणेत येतील. **सही/-**
जनसंपर्क/जा.क्र./४७९/२०२६/दि.४/३/२०२६ **उपआयुक्त (जनसंपर्क)**
आठवड्यातले दोन तास करु श्रमदान, स्वच्छतेच्या अभियानात देऊ योगदान **नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**
दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२०
**रिक्त जागा अधिसूचना क्र.: एमआरवीसी/ई/६५/२०२६/आरईजी दिनांक ०२-०३-२०२६**
मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड **आयडीए ई३ स्केलमध्ये "व्यवस्थापक (सिव्हिल)"** च्या ०५ पदे नियमितपणे भरण्यासाठी अर्ज मागवत आहे. ई-मेलद्वारे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **२०-०३-२०२६** आहे. अधिक माहितीसाठी, कृपया **https://mrvc.indianrailways.gov.in** या वेबसाइटला भेट द्या. **शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वेबसाइट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**

**महाराष्ट्र शासन**
**इलाखा शहर विभाग, (सा.बां.)**
**ई - निविदा सुचना क्र. ९१ सन २०२५-२०२६**
कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई ( दुरध्वनी क्रमांक - २२०१६९७५ / २२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | मुंबईतील शहिद भगतसिंग मार्गावरील जुन्या कस्टम हाऊसच्या समोरील बाजूस, ग्रा. फ्लोअरवरील विविध कार्यालयांच्या बाह्य खिडक्यांची दुरुस्ती, प्रवेशद्वाराचे सुशोभीकरण आणि लाकडी कामासाठी मेलामाइन पॉलिश आणि लाकडी कामाचे अपग्रेडेशन करणे. | १८.०२ |
| २ | एल्फिस्टन टेक्निकल हायस्कुल आवार मुंबई येथील आरसीसी टँक, पीसीसी, एनएसएस ऑफिस, पंप रूम समोरील व मागील बाजूस दुरूस्तीचे काम करणे. | १८.३२ |
| ३ | मुंबईतील शहिद भगतसिंग मार्गावरील जुन्या कस्टम हाऊसच्या समोरील बाजूस बाह्य वेदर शेड, लाकडी कंस, पुर्लिन, इव्हज बोर्डची दुरुस्ती करणे. | ३४.५१ |
| ४ | मुंबईतील शहिद भगतसिंग मार्गावरील जुन्या कस्टम हाऊसच्या समोरील बाजूस बाह्य प्लास्टरची दुरुस्ती, चर पुरवणे आणि पुनर्रचनेचे काम करणे. | २७.७१ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. ५.३.२०२६ ते दि. १२.३.२०२६ पर्यंत.
ई-निविदा उघडणे - दि. १३.३.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचनेमध्ये काही बदल/ सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in
जा.क्रं. इशवि/निलि/१७७३
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय, सही/-
सार्वजनिक बांधकाम विभाग, **(व्ही. ए. पाटसकर)**
२ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, कार्यकारी अभियंता,
मुंबई - ४०० ००१. इलाखा शहर विभाग, मुंबई.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक: २७/२/२०२६ क्रमांक: आरओसी- २०२५-२६/क्र. ५/सी ६२९९

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
**ई-निविदा सुचना क्र. २१/२०२५-२६**
महावितरण कंपनीच्या ई-टेंडर फॉर वर्क्स मध्ये अधिकृत नोंदणी केलेल्या व अर्हताप्राप्त ठेकेदारांकडून पुढील कामांसाठी टक्केवारी पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे निविदा क्र. काअ/स्था/कोल्हापूर/ १) टी-६२/२०२५-२६ - सं. व सु. विभाग, इचलकरंजी अंतर्गत स्थापत्य विषयक दैनंदिन देखभालीचे कामे करणे. - ०९.९७ लाख., २) टी-६३/२०२५-२६ - सं. व सु. ग्रामीण विभाग-१, कोल्हापूर अंतर्गत स्थापत्य विषयक दैनंदिन देखभालीचे कामे करणे. - ०९.९९ लाख., ३) टी-६४/२०२५-२६ - सं. व सु. ग्रामीण विभाग-२, कोल्हापूर अंतर्गत स्थापत्य विषयक दैनंदिन देखभालीचे कामे करणे. - ०९.९९ लाख., ४) टी-६५/२०२५-२६ - सं. व सु. ग्रामीण विभाग, सांगली अंतर्गत स्थापत्य विषयक दैनंदिन देखभालीचे कामे करणे. - ०९.९८ लाख., ५) टी-६६/२०२५-२६ - ईश्वरपूर जिल्हा सांगली येथील प्रशासकीय इमारतीच्या ईश्वरपूर विभाग कार्यालयाच्या टेरेस परिसरात विविध देखभालीची कामे करणे जेणेकरून त्याचा वापर सभागृह म्हणून केला जाईल. - ०९.९९ लाख., ६) टी-६७/२०२५-२६ - सं. व सु. शहर विभाग, सांगली अंतर्गत स्थापत्य विषयक दैनंदिन देखभालीचे कामे करणे. - ०९.९८ लाख., ७) टी-६८/२०२५-२६ - सं. व सु. शहर विभाग, सांगली अंतर्गत मिरज शहर, मिरज ग्रामीण-१ आणि मिरज ग्रामीण-२ उपविभाग परिसर मिरज येथे पुरुष व महिला स्वच्छता गृह बांधणे. - ०६.६६ लाख., ८) टी-६९/२०२५-२६ - विश्रामबाग, सांगली परिसरा अंतर्गत स्थापत्य विषयक दैनंदिन देखभालीचे कामे करणे. - ०९.९८ लाख., ९) टी-७०/२०२५-२६ - सं. व सु. विभाग, विटा व मंडल कार्यालय सांगली अंतर्गत स्थापत्य विषयक दैनंदिन देखभालीचे कामे करणे. - ०९.९९ लाख.,
सदर निविदा सूचना व निविदा प्रपत्र महावितरण कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर https://etender.mahadiscom.in **दि. ०५-०३-२०२६ ते ११-०३-२०२६ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत** खरेदीस उपलब्ध आहे. तसेच सदर निविदा भरण्याची अंतिम **दि. ११-०३-२०२६ दु. १३.०० वाजेपर्यंत** आहे. निविदा शुल्क व बयाणा रक्कम फक्त ऑनलाईन पध्दतीने भरणेची आहे. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करणेचे अधिकार राखून ठेवलेले आहेत. कृपया सदर निविदांसाठी भविष्यातील मुदतवाढ, शुद्धीपत्रक इ. बाबत महावितरणाच्या संकेतस्थळास भेट द्यावी. त्याबाबतचा तपशील वर्तमानपत्रात प्रसिद्ध केला जाणार नाही. नोंदणीकृत कंत्राटदार यांनी या संबंधीच्या सूचना महावितरण कंपनीच्या वरील संकेतस्थळावर वेळोवेळी तपासणी करत राहावी. अधिक माहिती करीता अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, कोल्हापूर संपर्क क्र. ७८७५७६९७४५ यांना संपर्क साधावा.
**(पी. आर.ओ. क्र. कोप - ३०१/२०२५-२६)**
**कार्यकारी अभियंता (स्था), कोल्हापूर**

जा.क्र. 953 /2026
धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, सास्मिरा इमारत,
सास्मिरा रोड, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
दिनांक - २४/०२/२०२६
**जाहिर नोटिस**
**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०, कलम ४७ अन्वये खालील नमुद न्यासात विश्वस्तांची नेमणूक करणे बाबत**
**अर्ज क्रमांक :- ८३/२०२५**
**न्यासाचे नाव : विद्या मंदिर गोरेगाव"**
**न्यास नोंदणी क्रं :- एफ -४६८ (मुंबई)**
१. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ अन्वये दाखल अर्ज क्रमांक ८३/२०२५ मधील अर्ज निशाणी क्रमांक १ वर मा. धर्मादाय सह आयुक्त - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक २६/०९/२०२५ रोजी आदेश पारीत केला आहे. सदर आदेशानुसार संबंधित लोकांना व आम जनतेला या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, :-" **विद्या मंदिर गोरेगाव " नोंदणी क्रं. एफ - ४६८ (मुंबई)** "या न्यासात विश्वस्तांची नेमणुक करणेकरीता अर्जदार यांनी सदर अर्ज दाखल केला आहे.
२. अर्जदाराने नि. क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे न्यास नोंदणीच्या वेळी न्यासाचे कामकाज पहाण्यासाठी खालील व्यक्ती होते.
१. श्री. डी.व्ही.सोवनी
२. श्री. एस. व्ही परांजपे
३. श्री. जी.व्ही. भडकमकर
४. श्री. ए.एम. पाध्ये
५. श्री. व्ही. डी जोशी
६. श्री. जी एस देसाई
७. श्री व्ही. पी खानोलकर
३. अर्जदार यांनी खालील विश्वस्तांची न्यासाच्या विश्वस्तपदी नेमणूक करण्यासाठी विनंती केली आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.
१. श्री. अरविंद दामोदर सोवनी
२. श्री. अशोक शिवराम कोळेकर
३. सौ. गीता वासुदेव नलावडे
४. सौ. स्मिता गोपीनाथ जाधव
५. श्री. गोविंद एकनाथ गुंजाळ
६. सौ. स्नेहल विजय आयरे
७. श्री. ज्ञानदेव देमाजी घुगे
४. सदरचे प्रकरण उपरोक्त नमुद व्यक्तींची न्यासात विश्वस्तपदी नेमणुक करण्यासाठी मा. धर्मादाय सह आयुक्त - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे समोर दिनांक **०७/०४/२०२६ रोजी सकाळी ११.००** वाजता ठेवण्यात आले आहे. तरी वरील नमुद पदनियुक्ती बाबत कोणाला काही हरकती / आक्षेप किंवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी स्वतः सदर नोटीस जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यत या कार्यालयात हजर राहुन लेखी हरकत किंवा म्हणणे मांडावे. जर कोणीही हजर न राहिल्यास आपणास काहीही हरकत / म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरुन योग्य तो कायदेशीर न्याय निर्णय घेण्यात येईल याची आपण सर्वांनी नोंद घ्यावी.
ही नोटीस माझे सही व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्यानिशी आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी दिली.
**आपली विश्वासू,**
**(सीमा केणी)**
**अधिक्षक (न्याय),**
**धर्मादाय आयुक्त कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# सिद्धांत मांडणार बलियातील अनुभव




बॉलीवूड अभिनेता सिद्धांत चतुर्वेदी याने आपल्या मूळ गावाची म्हणजेच बलियाची कथा चंदेरी पडद्यावर मांडण्याचा निर्णय घेतला आहे. 'इश्किया' फेम दिग्दर्शक अभिषेक चौबे यांच्यासोबत तो या खास प्रकल्पासाठी एकत्र येत आहे.

'गल्ली बॉय' मधील आपल्या दमदार पदार्पणापासून ते 'गेहराईंया', 'खो गये हम कहाँ' आणि 'धडक २' पर्यंत सिद्धांतने अभिनयाची एक वेगळी छाप पाडली आहे. मात्र, आता तो आपल्या वैयक्तिक अनुभवांवर आधारित एका कथेसाठी सज्ज झाला आहे. अद्याप याची अधिकृत घोषणा झाली नसली तरी, त्याला आता आपल्या मुळांकडे वळायचे आहे. बलियामधील त्याचे बालपण आणि तिथले अनुभव जगासमोर मांडण्याची त्याची मनापासून इच्छा आहे.

अभिषेक चौबे यांच्यासोबतच्या या सहकार्याबद्दल सिद्धांत कमालीचा उत्साही आहे. बलियाच्या पार्श्वभूमीवर बेतलेली ही कथा अत्यंत प्रभावी आणि वेगळी असल्याचे त्याने नमूद केले. अभिषेक चौबे यांच्या दिग्दर्शनाची शैली आणि सिद्धांतचे तिथले वास्तव्य यांचा मेळ या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. सध्या या चित्रपटाच्या कथेवर सविस्तर चर्चा सुरू असून, लवकरच हा प्रकल्प प्रेक्षकांच्या भेटीला येईल अशी अपेक्षा आहे.

# अहानची लपून राहिलेली दुखापत



अभिनेता अहान पांडे याने त्याच्या शारीरिक व्याधी आणि शस्त्रक्रियेबाबत केलेला खुलासा सध्या चित्रपटसृष्टीत चर्चेचा विषय ठरत आहे. 'सैयारा' या चित्रपटानंतर त्याने खांद्याची एक अत्यंत कठीण आणि वेदनादायक शस्त्रक्रिया करून घेतल्याचे समोर आले आहे. अहानने दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले की, काही वर्षांपूर्वी झालेल्या एका 'स्नोमोबाइल' अपघातात त्याच्या खांद्याला गंभीर दुखापत झाली होती. ही दुखापत त्याच्या आगामी ॲक्शन चित्रपटाच्या तयारीमध्ये अडथळा ठरत होती. शरीराची पूर्ण क्षमता राखण्यासाठी अखेर त्याने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. शस्त्रक्रियेनंतरचा काळ हा अहानसाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अत्यंत कठीण होता. वैद्यकीय तज्ज्ञांनी त्याला आधीच कल्पना दिली होती की, शस्त्रक्रियेनंतर त्याचे शरीर पूर्णपणे थकलेले असेल आणि पुन्हा पूर्वीसारखी शरीरयष्टी मिळवणे जवळपास अशक्य होईल. मात्र,अहानने हे आव्हान स्वीकारले आणि जिद्दीच्या जोरावर स्वतःला पुन्हा सिद्ध केले. विशेष म्हणजे, कित्येक महिने अहानच्या हाताला 'कास्ट' म्हणजेच मलमपट्टी होती, तरीही बाहेरील जगाला याची पुसटशी कल्पना नव्हती. सध्या अहान पूर्णपणे बरा झाला असून त्याने पुन्हा एकदा व्यायामाला सुरुवात केली आहे.

# पंकज-डिंपल यांचा 'जब खुली किताब'



**'झी ५' या** ओटीटी मंचावर लवकरच 'जब खुली किताब' हा चित्रपट प्रदर्शित होणार असून, त्याचा ट्रेलर नुकताच लाँच करण्यात आला आहे. पंकज कपूर आणि डिंपल कपाडिया यांसारख्या दिग्गज कलाकारांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट ६ मार्च २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येईल. सौरभ शुक्ला यांचे लेखन आणि दिग्दर्शन लाभलेल्या या चित्रपटाची कथा गोपाळ आणि अनुसूया यांच्या ५० वर्षांच्या प्रदीर्घ वैवाहिक प्रवासावर आधारित आहे. पन्नास वर्षे एकत्र राहिल्यानंतर जेव्हा अनुसूया एका जुन्या गुपिताचा उलगडा करते, तेव्हा त्यांच्या नात्याचा पायाच डळमळीत होतो. या धक्क्यातून सावरताना गोपाळ घटस्फोटाचा निर्णय घेतो आणि तिथूनच या कथेला भावनिक व मिश्किल वळण मिळते. चित्रपटातील आपल्या भूमिकेबद्दल बोलताना पंकज कपूर यांनी सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांमधील प्रेम, त्यातील गुंतागुंत व प्रामाणिकपणा सौरभ शुक्ला यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. वय वाढले तरी प्रेम संपत नाही, तर ते अधिक प्रगल्भ होते, हे या चित्रपटातून दिसेल. या चित्रपटात अपारशक्ती खुराना एका तरुण वकिलाची भूमिका साकारत आहे.

# फरहान-मुरुगदास-सनी पहिल्यांदाच एकत्र



बॉलिवूडमधील दिग्गज निर्मिती संस्था आणि कलाकारांच्या एकत्र येण्याने एका भव्य 'पॅन-इंडिया' ॲक्शन थ्रिलर चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. 'एक्सेल एंटरटेन्मेंट'चे रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांच्यासह प्रसिद्ध दिग्दर्शक ए. आर. मुरूगदास या चित्रपटासाठी पहिल्यांदाच अभिनेता सनी देओलसोबत काम करणार आहेत. या अद्याप नाव न ठरलेल्या चित्रपटाचे चित्रीकरण शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झाले आहे. या चित्रपटात दाक्षिणात्य अभिनेत्री ज्योतिका ही सनी देओलसोबत महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन बालाजी गणेश करणार असून, त्यांचा हा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. रितेश सिधवानी, फरहान अख्तर आणि ए. आर. मुरूगदास यांच्यासह कासिम जगमागिया, विशाल रामचंद्रनी, आदित्य जोशी, सुनील जैन आणि युसूफ शेख हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत.

# सुमुखीच्या शिरपेचात मानाचा तुरा



भारतीय विनोदी कलाकार, लेखिका आणि अभिनेत्री सुमुखी सुरेश हिच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. 'नेटफ्लिक्स इज अ जोक फेस्ट २०२६' या जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित महोत्सवात सहभागी होणारी ती एकमेव भारतीय विनोदी कलाकार ठरणार आहे. ४ ते १० मे २०२६ या कालावधीत लॉस एंजेलिसमध्ये रंगणाऱ्या या महासोहळ्यात सुमुखी आपली कला सादर करणार आहे. नेटफ्लिक्स आणि 'लाईव्ह नेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या या महोत्सवात जगभरातील ३५० हून अधिक कलाकार सहभागी होणार आहेत. यामध्ये स्टँड-अप कॉमेडी, पॉडकास्ट रेकॉर्डिंग आणि विविध सादरीकरणांचा समावेश असेल. ५ मे रोजी लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या सुमुखीच्या प्रयोगामुळे तिच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत एक महत्त्वाचा टप्पा गाठला जाणार आहे. नागपूरमधील लाजाळू आणि आत्मविश्वास नसलेली सुमुखी आपली भारतीय बहुभाषिक शैली सादर करण्यास कमालीची उत्सुक आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने सुमुखीचे 'होमोनल' हे विशेष सादरीकरण अमेरिकेतील विविध शहरांमध्ये २४ एप्रिल ते १७ मे या दरम्यान दाखवले जाणार आहे. याआधी २८ मार्च रोजी दुबईमध्येही तिचा कार्यक्रम होणार आहे. 'पुष्पवल्ली' सारख्या गाजलेल्या मालिका आणि 'कॉमिकस्तान' मधील मार्गदर्शक म्हणून सुमुखीने आपली ओळख निर्माण केली आहे.

# 'आडू-३'चा धमाकेदार ट्रेलर



मल्याळम चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय व 'कल्ट क्लासिक' ठरलेली 'आडू' ही चित्रपट मालिका आता तिसऱ्या भागासह प्रेक्षकांच्या भेटीला येण्यास सज्ज झाली आहे.'आडू ३' चा बहुप्रतिक्षित ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, शाजी पाप्पन व त्याची टोळी अधिक मोठ्या आणि ऐतिहासिक वळणावर उभी असल्याचे दिसून येत आहे. मिथून मॅन्युअल थॉमस यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटात जयसूर्या पुन्हा एकदा शाजी पप्पनच्या भूमिकेत दिसत आहे. मात्र, यावेळी कथेची व्याप्ती केवळ इडुक्की जिल्ह्यापुरती मर्यादित नसून, ती थेट इतिहासाशी जोडली गेली आहे. ट्रेलरमध्ये जयसूर्या एका राजेशाही थाटातील व्यक्तीच्या रुपात दिसत असून, तो एका रहस्यमय शस्त्राबद्दल बोलताना दिसतो. ब्रिटिश सैनिक ज्याला 'म्हैसूर रॉकेट' म्हणून संबोधतात, त्या शस्त्राचा संबंध शाजी पाप्पनच्या सध्याच्या आयुष्याशी कसा येतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# सह्याद्रीत 'तारा' च्या अधिवासात आता नवा 'शिलेदार' फिरतोय



■ कराड

**सह्याद्री** व्याघ्र प्रकल्पामध्ये आणखी एका नव्या नर वाघाने प्रवेश केला आहे. त्याची अधिकृत नोंद झाली असून त्याला एसटीआर टी -९ असा सांकेतिक क्रमांक देण्यात आला आहे. स्थानिक मार्गदर्शकांनी या वाघाचे 'शिलेदार' असे नामकरण केले आहे. विशेष म्हणजे सध्या हा 'शिलेदार' वाघिणी टी ५'तारा'च्या अधिवासात फिरताना दिसून येत आहे.

या नव्या 'शिलेदार'च्या नोंदीमळे प्रकल्पातील एकूण वाघसंख्या सातवर पोहोचली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून चांदोली राष्ट्रीय उद्यान परिसरात विविध कॅमेरा ट्रॅपमध्ये हा वाघ सातत्याने दिसून येत होता, त्याचे अनेक फोटो व व्हिडिओ वनविभागाच्या हाती लागले असून त्यानंतर त्याची स्वतंत्र ओळख निश्चित करण्यात आली. सध्या १९ 'शिलेदार' हा वाघिणी टी ५ 'तारा'च्या क्षेत्रात फिरताना आढळत आहे, विशेष म्हणजे तारा हिच्या क्षेत्रात आधीपासून ११ 'सेनापती' आणि १२ 'सुभेदार हे नर वाघ संचार करत आहेत. त्यामुळे तारा कोणत्या नराची निवड करणार, याकडे वन्यजीव अभ्यासकांचे लक्ष लागले आहे.

# नागपूर स्फोटक कारखाना स्फोट ११ जणांना अटक! मालक फरार

■ नागपूर

**नागपूर** जिल्ह्याच्या राऊळगावातील एसबीएल एनर्जी लिमिटेड या स्फोटक बनवणाऱ्या कारखान्यात झालेल्या स्फोटप्रकरणी पोलिसांनी दोन संचालकांसह ११ जणांना अटक केली. याप्रकरणी मालकासह २१ जणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला.मात्र या कारखान्याचा मालक अजूनही फरार आहे. या स्फोटातील मृतांचा आकडा १८ वर पोहोचला आहे.

या प्रकरणी काँग्रेसचे विजय वडेट्टीवार म्हणाले की, अशा घटना थांबण्यासाठी सरकार काय प्रयत्न करत आहे. मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात महिन्याला तीन-चार कारखान्यांत स्फोट होत आहेत. आरोपांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल केले आहेत. मात्र या प्रकरणी सरळ सरळ हत्या झाली आहे. या आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. तर माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख म्हणाले की, या कारखान्याचा मालक अद्याप फरार आहे. या मालकाला पोलिसांनी लवकरात लवकर अटक करावी.

# थकबाकीदारांची यादी आता थेट डिजिटल बोर्डावर लावा

## यड्राव बँकेचे शिवाजी बेडगे यांची मागणी

■ शिरोळ

**कोल्हापूर** जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील चिपरी गावातील अनेक नागरिकांनी कर भरलेला नाही. त्यामुळे आता अशा कर थकबाकीदारांची नावे थेट डिजिटल बोर्डावर जाहीर करावीत,अशी मागणी यड्राव बँकेचे संचालक शिवाजी बेडगे यांनी केली आहे.

शिवाजी बेडगे म्हणाले की, या ग्रामपंचायतीचा कर भरण्यासाठी प्रोत्साहन म्हणुन ५० टक्के सवलत जाहीर करण्यात आली होती. ३१ डिसेंबर २०२५ अखेर कर न भरणाऱ्या थकबाकीदारांची यादी ५ जानेवारी २०२६ ला डिजिटल बोर्डद्वारे प्रसिध्द केली जाईल, असे जाहीर केले होते. तरीही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तरी पुढील आठ दिवसांत अशी यादी जाहीर झाली नाहीतर आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा गंभीर इशाराही शिवाजी बेडगे यांनी दिला आहे.

त्यानंतर आता पुढील आठ दिवसांची मुदत सहानुभूती म्हणून दिली आहे. त्यातूनही कर भरला नाही तर डिजिटल बोर्डद्वारे नावे प्रसिध्द केली जातील. थकबाकीदारांनी त्वरीत थकबाकी भरुन सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच दीपिका परीट यांनी केले आहे.

# मध्यप्रदेशात 'लाडली बहना'नंतर विद्यार्थ्यांसाठी 'फ्री मामा कोचिंग'

■ भोपाळ

**केंद्रीय** कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान हे लाडली बहना योजनेनंतर आपल्या ५ मार्च रोजीच्या वाढदिवसानिमित्त पाच संकल्प जाहीर करणार आहेत. त्यातील प्रमुख उपक्रम म्हणजे रायसेन, विदिशा आणि सिहोर जिल्ह्यातील भेरुंदा येथे 'फ्री मामा कोचिंग क्लासेस'ची सुरुवात करणार आहेत. या उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी, तसेच मध्य प्रदेश पब्लिक सर्व्हिस कमिशन परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन दिले जाणार आहे. दुर्गम भागात राहणारे आणि कोचिंग सेंटरपर्यंत पोहोचू न शकणारे विद्यार्थी घरबसल्या स्पर्धा परीक्षांची तयारी करू शकतील, यासाठी ऑनलाईन कोचिंगची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

विदिशा, रायसेन आणि भेरुंदा येथील पहिल्या तुकडीत प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांचा समावेश असेल. मोफत कोचिंग कार्यक्रमासाठी अर्ज फॉर्म ५ मार्च रोजी वितरित करण्यात येतील. चौहान आपल्या विदिशा लोकसभा मतदारसंघातील सर्व आठ विधानसभा मतदारसंघांसाठी मोबाईल रुग्णालयांचीही सुरुवात करणार आहेत.

# शिवजयंतीला परवानगी नाकारली देसाई कॉलेजबाहेर अभाविपची निदर्शने

■ पुणे

पुण्यातील एच.व्ही.देसाई महाविद्यालय प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यास परवानगी नाकारली असा आरोप करत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाबाहेर निदर्शने केली. प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांनी निर्णयाचा निषेध केला. अभाविपच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात ६ मार्च रोजी तिथीनुसार शिवजयंती कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रशासनाकडे परवानगी मागितली होती. मात्र, महाविद्यालय प्रशासनाने ही परवानगी नाकारल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. यामुळे संतप्त विद्यार्थ्यांनी शनिवार वाडा परिसरातील महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आंदोलन छेडले. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महान ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाची जयंती साजरी करण्यास विरोध का केला जात आहे? असा सवाल उपस्थित केला.

# महावितरण कार्यालयात राष्ट्रीय लाईनमन दिन साजरा

■ कल्याण

**महावितरण** कंपनीच्या कल्याण परिमंडळात राष्ट्रीय लाईनमन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात लाईनमन (जनमित्र) यांना मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी संबोधित केले.



ते म्हणाले की, जनमित्र हा महावितरण कंपनीचा ग्राहक आणि अधिकारी यांच्यातील संपर्क साधणारा दुवा आहे. एका अर्थाने आपण महावितरणच्या व्यवस्थेतील मुख्य कणा आहे.

योवेळी उपस्थित सर्व जनमित्रांना सुरक्षा उपकरणे वापरण्याचे आवाहन करण्यात आले. यानंतर काढण्यात आलेल्या बाईक रॅलीला मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी हिरवा झेंडा दाखवला. ही रॅली संतोषी माता रोड, प्रेम ऑटो चौक,खडकपाडा सर्कल,साई चौक,वाणी विद्यालय, संदीप हॉटेल, बिर्ला कॉलेज, पौर्णिमा चौक मार्गे परिमंडळ कार्यालयात परत आली.

# पुण्यातील मुळा नदी पात्रात सफेद फेस आणि काळा गाळ

■ पुणे

**पुण्याच्या** पश्चिमेला मुळा नदी पात्रात पाण्याच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात पांढऱ्या फेसाचे थर दिसत असून काही ठिकाणी काळसर रंगाचा मैलामिश्रित गाळ साचलेला आढळून येत आहे. शहराच्या प्रमुख नद्यांपैकी एक असलेली मुळा नदी सध्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे.

काही महिन्यांपासून मुळा नदीपात्रात अस्वच्छ पाण्याचा ओघ सातत्याने वाढत आहे. सांडपाण्यातील रासायनिक घटक, डिटर्जंट आणि कचरा यामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण घटत आहे.

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणारे ३१६ अधिकारी निलंबित

■ मुंबई

राज्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांविरोधात राज्य सरकारने मोठी कारवाई केली. पडताळणीदरम्यान बोगस कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्याने ३१६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी विधिमंडळात दिली.

भाजपा आमदार श्रीकांत भारतीय यांनी लेखी प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर दिलेल्या उत्तरात राज्यातील २८ जिल्हा परिषदांमधील दिव्यांग कर्मचाऱ्यांची तपासणी सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अंतरिम अहवालानुसार राज्यात एकूण १० हजार ९२२ दिव्यांग अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी ६ हजार २१८ जणांची पडताळणी पूर्ण झाली. या तपासणीत काही कर्मचाऱ्यांकडे वैध प्रमाणपत्र नसणे, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणे किंवा ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असतानाही लाभ घेतल्याचे आढळले. अशा ३१६ जणांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# एसटीला पाच वर्षांत होणार २५० कोटी रुपयांची कमाई

■ मुंबई

**एसटी** महामंडळाला पुढील ५ वर्षांत जाहिरातींच्या माध्यमातून २५० कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळणार आहे. परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही घोषणा केली.एसटीच्या १२ हजार बसेस, २५९ आगारे आणि ६१० बसस्थानकांवर जाहिराती लावून हे उत्पन्न वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.



प्रताप सरनाईक म्हणाले की,एसटीची पोहोच राज्यातील प्रत्येक गावखेड्यापर्यंत आहे.महामंडळाची २५१ आगारे,६१० बसस्थानके आणि सुमारे १२ हजार बसेसचा ताफा ही जाहिरातदारांसाठी मोठी बाजारपेठ आहे. या संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी बसेसचा बाहेरील आणि आतील भाग जाहिरातींसाठी उपलब्ध केला जाईल. बसस्थानक परिसर आणि इमारतींचा वापर महसूल वाढीसाठी होईल.नव्या निविदा प्रक्रियेद्वारे पारदर्शकपणे कंत्राट देण्यात आले आहे.

या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सध्या एसटीला जाहिरातींतून वार्षिक २२ कोटी रुपये मिळतात. मात्र,नव्या निविदा प्रक्रियेमुळे या उत्पन्नात दुपटीहून अधिक वाढ होणार असून वार्षिक सरासरी ५० कोटी रुपयांपर्यंत महसूल मिळणे अपेक्षित आहे.


# सेस इमारतीतील रहिवाशांच्या बायोमेट्रिकला गती मिळणार

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील उपकरप्राप्त इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांचे बायोमेट्रिक करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे. वर्षभरात हे बायोमेट्रिक सर्वेक्षणाचे काम खासगी एजन्सीमार्फत पूर्ण करण्यासाठी झोननुसार निविदा काढण्याचा निर्णय म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने घेतला आहे.

म्हाडाच्या साडेबारा हजार उपकरप्राप्त इमारती आहेत. आता एकाचवेळी आणि एका वर्षात सर्व इमारतीतील रहिवाशांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण जलदगतीने व्हावे. यासाठी दक्षिण मुंबईतील असलेल्या एकूण चार झोन मध्ये बायोमेट्रिकचे काम खासगी एजन्सीना देण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे. एका एजन्सीकडे ३ हजार घरांच्या बायोमेट्रिक सर्वेक्षणाची जबाबदारी सोपविली जाणार आहे. अशा एकूण ४ लाख खोल्या आहेत. त्यांचे बायोमेट्रिक वेळेत पूर्ण करून पुढील निर्णय घेतला जाईल.

# नवाकाळ शब्दकोडे १५३७



**आडवे शब्द-**

१. वेष्टित, झाकलेले ३. निरुपाय ६. राजाप्रमाणे देखणा व रुबाबदार ९. स्वर्ग १३. मूर्ख १५. फेकून द्यावे असे १७. वेढा, घेराव १९. पवित्र, शिव २०. पक्की हातशिलाई २१. खाबू, भ्रष्ट २४. श्रीकृष्णाची खुनशी मावशी २६. लहान मुलीची कर्णभूषणे २७. तांबडा भोपळा २९. श्रेष्ठ ३१. उर्मट, घमेंडखोर ३३. नवरदेव ३४. रास ३५. एक हलके तृणधान्य ३६. अतिरेक ३८. केर काढण्याचे साधन ३९. लोचट ४१. पत्त्यांच्या खेळातले शक्तिशाली पान ४३. चंद्र ४६. दूध-शेवयांचे पक्वान्न ४७. उभा ४८. स्वार्थ ४९. अतिशय जास्त ५१. निधन झालेला ५३. अंकुर ५५. पन्ना, पाचू ५६. याग, यज्ञ ५८. दुधाचा विदेशी पदार्थ ५९. व्यवस्थित ६०. आश्रय ६२. जमीन मोजण्याचे एक परिमाण ६४. लोकप्रिय कडधान्य ६५. अग्नी ६६. गुह्य, अगम्य ६८. माणसे, लोक ६९. देवाला सोडलेला बैल, सांड ७०. चरबी ७१. एक त्वचारोग ७२. युनानी डॉक्टर ७५. व्यापारातील फायदा ७७. अंदाज, तर्क, ठोकताळा ७९. नट्टापट्टा, तोरा ८१. उभे पीक; गावाभोवतीची मोकळी जागा ८२. मंगळवार ८३. झाडाचे पान ८४. निर्विवाद ८८. उपवासाचा एक पदार्थ ८९. शेअर, हिस्सा ९०. परीट ९२. वापरात नसलेली जमीन ९३. स्वार ९४. मसालेदार पदार्थासाठी मुख्य प्रक्रिया ९६. बांधकामातील घटक ९७. विष्णूचा एक अवतार ९८. किरकोळ वस्तू; कार्यालयातील कागदांचा एकत्र गठ्ठा १००. मृदंग १०२. स्वच्छंद भटकंती १०५. अभिमानी १०८. लहर ११०. नदी जेथे समुद्राला मिळते, तेथील पाण्याचा साठा/टापू १११. अकबराच्या दरबारातील एक मानकरी ११३. जुन्या रुपयातील एकूण आणे ११४. उणे ११५. भडक, दिखाऊ ११६. सर्वत्र बिनदिक्कत होणारे ११७. प्राप्ती

**उभे शब्द-**

१. शेकोटी २. उतारवय ४. प्रदेश, टापू ५. निगा नसलेले राठ केस ६. घोडेस्वार ७. रहस्य, गुपित ८. गाढ झोप १०. उगवत्या सूर्याचा देश ११. मजल, मर्यादा १२. आर्जवे १४. संयोग १६. रुई १८. पसरट टोपली २२. आंदोलन २३. इक्षुदंड २५. पराभूत, हरलेला २८. गार, थंड ३०. मर्मज्ञ चाहता ३२. आलाप, तान ३३. पृथ्वी ३४. धूर्तता, लबाडी ३७. चांदी, रूपे ४०. लाकडी स्टूल ४१. पायताण ४२. लाल छटा ४४. नीलमणी, आंब्याची एक जात ४५. दफनभूमी ४७. पिकांचे टॉनिक ४९. म्हणून, यास्तव ५०. सरपणाचे दुकान ५२. गजानन ५३. धुमाकूळ, राडा ५४. ढीग, चळत ५६. ओळ, रांग ५७. टंचाई, कमतरता ६१. समाचार, क्षेम ६३. जाणूनबुजून, मुद्दाम ६७. शैली ६८. बस्तान ७१. हेतू ७३. पोपट ७४. नाकातील अलंकार ७६. पुष्कळ ७७. सरबराई ७८. निर्दोष व्यक्तीवर ठपका ठेवणे ८०. बखोट ८५. किनारा ८६. सोय, व्यवस्था ८७. तुच्छतेची वागणूक ८९. किराणा दुकानदार ९१. कारस्थान ९३. कैरी सुकवून केलेले चूर्ण ९५. मोठा लाभ ९९. अव्यवस्थित, अजागळ १०१. वितरण १०३. फांदी १०४. सोपे १०६. अरण्य १०७. कर्मचाऱ्याने मागितलेली सुट्टी १०९. शोले सिनेमात गब्बरचा विश्वासू साथीदार १११. कमळाच्या देठातील तंतू ११२. पीडा, संकट •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५३६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. आलोचना ५. होजिअरी ८. टोप १०. कापड १३. भोगवटा १५. चक्रम १६. वमन १८. रंगतदार २०. गीजर २१. चक्की २२. गायन २३. लिखापढी २४. वणवण २६. यार्ड २७. तहान २९. सावित्री ३०. सद ३१. वारी ३३. गवार ३४. हनन ३६. चारा ३७. मलम ३९. जलदी ४०. मानव ४२. यमल ४३. वेगवान ४४. राब ४५. खरा ४६. चंदन ४७. रीतसर ४९. मुख ५१. लाघवी ५३. नाद ५४. वितरण ५५. पारावार ५७. टसर ५९. दध्योदन ६१. शरद ६२. तडक ६४. शावक ६५. रातवा ६८. पाय ६९. नक्षी ७१. कनक ७२. कंटक ७३. खलनायक ७४. रथ ७५. कवटी ७७. लट्टू ७८. शिसा ७९. नेपाळ ८०. पंचकल्याणी ८१. कोंडमारा ८४. पागडी ८५. पगडी ८६. तप ८८. ईर ८९. साकसुरत ९२. पागनीस ९४. बाळ ९६. रंगीत ९७. कुरुक्षेत्र ९८. रमणीय ९९. वजनकाटा १००. पीत १०१. ताठा १०२. कोस

**उभे शब्द** : १. अभोगी २. आवरण ३. लोटा ४. नाचक्की ५. होमगार्ड ६. अवनत ७. रीम ९. परंपरावादी १०. कात ११. पदार्थविज्ञान १२. डर १४. गजवदन १७. नलिन १९. गढी २१. चण २५. वर्ण २६. यारी २८. हानी ३०. सहस्रचंद्रदर्शन ३१. वारा ३२. कालवा ३३. गलबला ३५. नयन ३६. चालरीत ३७. मगर ३८. मनमुराद ३९. जरा ४०. मारा ४१. वरदविनायक ४३. वेसण ४५. खवीस ४८. तरट ५०. खवा ५२. घटक ५४. विनवणी ५५. पारवा ५६. रत ५८. रक्षा ६०. दशा ६१. शतक ६३. डच्चू ६५. रानटी ६६. कोटकल्याण ६७. शील ६८. पायजमा ७०. क्षीरसागर ७१. कवळ ७३. खट्ट ७५. कपाळकरंटा ७६. खिचडी ७८. शिपाई ८०. पंगत ८२. डग्गा ८३. राउळ ८५. परतणे ८६. तग ८७. पनीर ९०. सुगी ९१. मरुत ९२. पात्रता ९३. समज ९४. बायको ९५. खून ९७. कुपी

## एकनाथ शिंदे दावोसला जात असताना इराण हद्दीत त्यांचे विमान पाडणार होते!

पान १ वरून

अपघाताची जबाबदारी झाडांवर ढकलण्यासाठीच एएआयबीकडून असा दिशाभूल करणारा अहवाल तयार केला. त्यामुळे अहवाल गांभीर्याने बनवण्यात आला का, हा प्रश्न निर्माण होतो. मी व्हीएसआर किंवा डीजीसीएच्या विरोधात नाही. पण या कंपनीला कुणीतरी वाचवत आहे. हा प्रयत्न कोणा मोठ्या व्यक्तीकडून होतो आहे का? असे असेल तर अजितदादांचा घात की अपघात याचा तपास योग्य रितीने होणार नाही. त्यांचे विमान उजव्या बाजूला झुकल्याचे व्हिडिओमध्ये दिसते. मात्र अहवालात विमान डाव्या बाजूला झुकले असे म्हटले आहे. जे पूर्णपणे चूक आहे. या अहवालात ब्लॅक बॉक्सचा फोटो अपेक्षित होता. मात्र त्यांनी तो दिलेला नाही. ब्लॅक बॉक्सचे कुठेही नुकसान झालेले नाही. हे लेअरजेट ४५ एक्सआर विमान आधी सुरतला गेले होते. अजित दादांना सोडून हे विमान हैदराबादला जाणार होते. या विमानात ९० टक्के इंधन भरले होते. यामुळे अपघात झाल्यावर मोठा स्फोट झाला. या विमानाच्या उड्डाणाचे फक्त ८५ तासांचे आयुष्य उरले होते, असे सांगितले जात होते. प्रत्यक्षात या विमानाच्या उड्डाणाचे ३ हजार तास जास्त झाले होते. मुख्य पायलट काहीच बोलत नव्हता. दृश्यमानता कमी होती हेदेखील अहवालातून स्पष्ट झाले आहे. सरकारसाठी विमानांचे नियोजन करणारी ॲरो कंपनी, कर्मचारी मनोज पवार, मालक या सगळ्यांची चौकशी केल्याशिवाय खरे कळणार नाही. डीजीसीएमधील अधिकाऱ्यांनाही वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ताकदवान लोकांच्या मदतीने हा प्रयत्न होत असेल तर तपास योग्य पद्धतीने होणार नाही. या सर्वांकडे क्रिमिनल आणि तांत्रिक दृष्टीने बघावे लागणार आहे. कागदपत्रे रंगवली जाऊ शकतात. तसेच होत आहे. अपघात आणि पत्रकार परिषदेनंतर ही विमाने महाराष्ट्राबाहेर आणि देशाबाहेर काढली जात आहेत. हैदराबादला असलेले लेगसी ६०० हे विमान आता सॅन मारिनो (अमेरिका)ला हलवण्यात आले आहे. धंदासुद्धा भारतातून हलवण्याचे काम सुरू झाले आहे. जर तुम्ही चोर नसाल घाबरता कशाला? चोरच घाबरू शकतो.

### व्हीएसआरमागे शक्तिशाली लोक

रोहित पवार म्हणाले की, डीजीसीएचे जॉइंट डायरेक्टर मनीष कुमार यांचे घर व्ही.के. सिंग यांनी बांधून दिल्याची माहिती आहे. आंध्रप्रदेशच्या तेलगू देसम पक्षाचे उद्योग मंत्री सिंग यांच्याशी थेट संबंध आहे. व्हीएसआरमध्ये ९० लाख शेअर विस्ता कंपनीचे आहेत. विस्ता सेलमध्ये अम्बूजा आणि लंबोदरची गुंतवणूक आहे. विस्ता सेलच्या २७ वेगवेगळ्या कंपन्या आहेत. महेंद्र कुमार गोयंका या कंपन्यांमध्ये डायरेक्टर आहेत. या कंपनीत संजय पाठक नावाची व्यक्ती आहे. ते भाजपाचे मध्यप्रदेशचे आमदार आहेत. ते अतिशय श्रीमंत आहेत. या कंपन्यांमध्ये संजय पाठकचा मुलगा संचालक आहे. एका आमदाराने २४२ कोटींचे प्रायव्हेट विमान विकत घेतले आहे. नाशिकचे दिलीप बिल्डकॉनचे दिलीप सूर्यवंशी यांनी या कंपनीला गॅरंटी दिली आहे. ती कुणाच्या सांगण्यावरून दिली? यांना कोण वाचवत आहे? ज्युबली हिल्समध्ये कोण राहते? बाजारभावापेक्षा १७ कोटी रुपये जास्त देऊन ही मालमत्ता खरेदी करण्यात आली आहे. नमन आणि सोफिटेल समूह व्हीएसआरच्या पाठीशी आहेत. व्हीएसआरमध्ये १०० कोटींची गुंतवणूक झाली. यामागे कोण आहे, हे शोधून काढले पाहिजे. डीजीसीए या लोकांना वाचवत आहे. दादांची चौकशी राहिली बाजूला, संजय पाठकने जजलाही मॅनेज करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे डीजीसीएला मॅनेज करायला किती वेळ लागेल? तुमचा पैसा कायदेशीर आहे की हवालामार्फत आणला आहे याच्याशी आम्हाला घेणे नाही. फक्त चौकशी व्यवस्थित झाली पाहिजे एवढेच म्हणायचे आहे.

रोहित पवारांनी असाही दावा केला की, अजित पवार यांच्या विमान अपघातापूर्वी रेकी करण्यासाठी तिथे काही लोक आले होते, असे स्थानिकांनी सांगितले आहे. याबाबत तपास झाला पाहिजे. याकडे सीआयडी व सीबीआयने थोडेसे लक्ष घालावे. व्हीएसआर कंपनीच्या विमानाचा २०२३ मध्ये मुंबई विमानतळावर अपघात झाला होता, त्यावेळी के. रामचंद्रन यांचे नाव तपास अधिकारी म्हणून लिहिले होते. ते विमान मालकाने नंतर दिल्लीला नेले. पण अजित पवारांच्या अपघाताच्या अहवालात कोणत्याही तपास अधिकाऱ्याचे नावच नाही. कारण ते घाबरले असतील. कागदपत्रांची हेराफेरी वगैरे गोष्टी होणार आहेत. त्यामुळे नावच नको. म्हणजे त्यांच्यावर कोणी आक्षेपच घेणार नाही.

**रोहित पवारांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट**

शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आज संध्याकाळी मातोश्री निवासस्थानावर जाऊन माजी मुख्यमंत्री आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही नेत्यांनी अजित पवार विमान अपघात प्रकरणी ४५ मिनिटे चर्चा केली. या भेटीनंतर रोहित पवार यांनी सांगितले की,अजितदादांना न्याय मिळवून देण्याच्या आमच्या लढ्यात उद्धव ठाकरे आमच्या सोबत आहेत. त्यांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. विमान अपघात प्रकरणी योग्य तपास करण्यात येत नाही.अद्याप याप्रकरणी एफआयआर दाखल झालेली नाही, ही आश्चर्याची बाब आहे.आमचा नेता आणि माझा काका गेला. मात्र लोक अनेक विमानातून प्रवास करतात. लोकांचाही सुरक्षेचा विषय आहे, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

## चिनी निर्बंधांमुळे दुर्मीळ खनिजांसाठी जपानची भारताबरोबर भागीदारी

पान ८ वरून- भारताचे खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम भारतात सुमारे १.२९ दशलक्ष मेट्रिक टन ऑक्साईडचे साठे आहेत. गेल्या वर्षी भारत आणि जपानदरम्यान महत्त्वाच्या खनिज क्षेत्रातील सहकार्याबाबत प्राथमिक करार झाला होता. त्यानुसार जपानकडून प्रगत उत्खनन तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि प्रक्रिया कौशल्य उपलब्ध करून दिले जाऊ शकते. त्याबदल्यात जपानला स्थिर आणि दीर्घकालीन दुर्मीळ पृथ्वी पुरवठा मिळण्याची अपेक्षा आहे.दुर्मीळ पृथ्वी घटकांचा वापर इलेक्ट्रिक वाहनांच्या मोटर्स, पवनऊर्जा प्रकल्प, ड्रोन, लढाऊ विमाने आणि उच्च तंत्रज्ञान उपकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे भारत-जपान सहकार्य केवळ आर्थिकच नव्हे तर भू-राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. या भागीदारीमुळे जागतिक खनिज पुरवठा साखळीत भारताची भूमिका मजबूत होण्याची शक्यता आहे. हे चीनच्या वर्चस्वाला पर्याय निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

## महाराष्ट्राला आखाती युध्दाचा फटका

पान १ वरून

येत असलेले द्राक्षाचे ३०० कंटेनर परत पाठवण्यात येणार आहेत. सुमारे ७०० कंटेनर माल अद्याप बंदरातील शीतगृहांमध्ये पडून आहे.

जळगाव जिल्ह्यातून संयुक्त अरब अमिराती आणि अन्य आखाती देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर केळी आणि प्लास्टिक चटयांची निर्यात केली जाते. २०२५ मध्ये आखाती देशात जळगाव जिल्ह्यातून ६ हजार कंटेनर केळी निर्यात करण्यात करण्यात आली होती. मात्र युद्धामुळे २०० कंटेनर बंदरात अडकून पडले होते. त्यामुळे केळी उत्पादक आणि निर्यातदार चिंतेत आहेत. केळी हे नाशिवंत फळ असल्याने वेळीच निर्यात झाली नाही तर उत्पादकांना मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे. निर्यात थांबल्याने जिल्ह्यात केळीचे भावही कोसळले आहेत. त्यामुळे स्थानिक बाजारात कमी किमतीत केळी विकणे बागायतदारांना परवडणारे नाही.

केळ्यांप्रमाणे जिल्ह्यातून प्लास्टिकच्या चटयांची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते. रमजानमुळे चटयांना वाढती मागणी असल्याने कारखानदारांनी उत्पादनात वाढ केली आहे.परंतु निर्यातीवर निर्बंध आल्याने या जास्तीच्या चटया ठेवायच्या कुठे असा प्रश्न कारखानदारांना पडला आहे. जळगाव जिल्ह्यातून आखातातील सात देशांमध्ये चटयांची निर्यात केली जाते.

## राज्यात ४८,२७८ महिला-मुली वर्षभरात बेपत्ता!

पान १ वरून

भूमिका घेत राज्यातील सुरक्षा यंत्रणा अपयशी ठरत असल्याचा आरोप केला. त्यांनी म्हटले की, हा केवळ आकड्यांचा विषय नसून हजारो कुटुंबांच्या आयुष्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. तर कोकणात सद्यस्थितीत साधारणतः ७० मुली बेपत्ता असल्याचे भाजपा आमदार निरंजन डावखरे यांनी सांगत या विषयावर लक्षवेधी मांडून प्रशासनाचे लक्ष वेधले.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, वर्ष-दीड वर्षांचा काळ लोटल्यानंतर मुलींचे कुटुंबिय किंवा बेपत्ता झालेल्या वयस्कर व्यक्तींचे नातेवाईक पोलिसांकडे पाठपुरावा करणे सोडून देतात, असे अनेकदा दिसून येते. नातेवाईकांचा पाठपुरावा कमी झाला की माहिती मिळणे कठीण होते, ही तपासातील एक मोठी व्यावहारिक अडचण आहे. तरीही, पोलिसांनी केवळ नातेवाईकांच्या पाठपुराव्यावर अवलंबून न राहता सक्रिय राहावे. याशिवाय बेपत्ता मुला-मुलींचा शोध घेण्यासाठी राज्य पोलीस दलाकडून 'ऑपरेशन मुस्कान' मोहीम राबवली जात आहे. यामध्ये आतापर्यंत ४१,१९३ मुला-मुलींचा शोध घेण्यात यश मिळाले आहे. प्रत्येक जिल्ह्यात 'मिसिंग पर्सन सेल' सक्रिय करून रेल्वे स्थानके, बस डेपो आणि गर्दीच्या ठिकाणी देखरेख वाढवली आहे. बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्याचे ९५ ते ९६ टक्के उद्दिष्ट ठेवून तपास गतीने करावा. कामगिरीच्या आधारे पोलीस ठाण्यांचे मूल्यमापन करून निष्क्रिय ठाण्यांवर प्रशासकीय कारवाई केली जाणार आहे.

## ३१ मार्चपासून नांदेडहून नागपूर, गोवा विमानसेवा

**नांदेड -** येथील श्री गुरू गोबिंदसिंघजी विमानतळावरून आता नागपूर आणि गोवा या दोन शहरांसाठी येत्या ३१ मार्चपासून विमानसेवा सुरू होणार आहे. या नवीन विमानसेवेचे संचालन स्टार एअर ही विमान कंपनी करणार आहे. ही विमानसेवा आठवड्यातील ६ दिवस उपलब्ध असेल, केवळ शुक्रवारी विमानसेवा बंद राहील. या नव्या मार्गामुळे आता नांदेडहून अवघ्या तासभरात नागपूर व गोवा अंतरावर येणार. नांदेड ते गोवा (मोपा)- दुपारी २ वा. नांदेडहून उड्डाण होऊन दुपारी ३.२० वा. गोव्याला आगमन होईल.

## भाजपाची तावडे, आठवलेंना संधी शरद पवार पुन्हा राज्यसभेवर जाणार

पान १ वरून- काँग्रेस पक्षात असलेले वडकुते शरद पवार यांचे समर्थक मानले जाते. २००२ मध्ये त्यांची अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी विकास महामंडळावर नियुक्ती झाली होती. २००४ मध्ये त्यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यानंतर पक्षाने त्यांना विधान परिषदेवर पाठवले होते. २०१९ विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपामध्ये प्रवेश केला.

आदिवासी नेत्या माया इवनाते या द्रौपदी मुर्मू यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात. त्या अनुसूचित जमाती राष्ट्रीय आयोगाच्या सदस्य म्हणून कार्यरत होत्या. त्या नागपूरच्या माजी महापौरही आहेत. अलीकडील महापालिका निवडणुकीत त्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. नागपूरमधील नेतृत्वाला बळ देण्याच्या दृष्टीने भाजपाने त्यांना राज्यसभेची संधी दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद भूषवलेल्या विनोद तावडेंनी शालेय शिक्षण, उच्च व तांत्रिक शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास तसेच मराठी भाषा व संस्कृती या खात्यांचे मंत्रिपद सांभाळले आहे. २०१९ मध्ये त्याचे तिकीट कापून त्यांना पक्ष संघटनेत जबाबदारी देण्यात आली. गेल्या वर्षी झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत त्यांनी प्रभारी म्हणून काम केले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) रामदास आठवले यांना यंदा राज्यसभेची उमेदवारी मिळणार की नाही, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र भाजपाने आपल्या कोट्यातून सलग तिसऱ्यांदा त्यांना राज्यसभेची संधी दिली आहे.

दुसरीकडे, मविआने एका जागेसाठी शरद पवार यांचे नाव निश्चित केले आहे. याआधी राज्यसभेची जागा आम्हाला द्यावी, अशी भूमिका काँग्रेसने घेतली होती. काँग्रेसकडून माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाची चर्चा होती. परंतु आज काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांनी राज्यातील नेत्यांना फोन करून शरद पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. उबाठानेही शरद पवार यांच्या नावाला मान्यता दिल्याचे कळते. त्यामुळे आता ही निवडणूक बिनविरोध होणार आहे. शरद पवार यांच्याव्यतिरिक्त काँग्रेस किंवा उबाठाने उमेदवार दिला असता तर भाजपाने आपण पाचवा उमेदवार देऊ, असे म्हटले होते.

## ट्रम्पनी उद्या व्हाईट हाऊसमध्ये शस्त्रास्त्र कंत्राटदारांना बोलावले



तेहरानवर झालेल्या हल्ल्यांत माजिद असगरीपूर येथील पोलीस ठाणे लक्ष्य.

पान १ वरून

अमेरिकेच्या शस्त्रसाठ्यावर परिणाम झाला. आता इराणविरोधातील कारवायांमुळे लांब पल्ल्याच्या अत्याधुनिक क्षेपणास्त्रांचा वापर वाढल्याने साठा पुन्हा वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे. अमेरिकेने अलीकडील कारवाईदरम्यान टॉमहॉक क्रूझ क्षेपणास्त्र आणि एकेरी हल्ला करणाऱ्या ड्रोनचा मोठ्या प्रमाणात वापर केला. या शस्त्रांची निर्मिती प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक असल्याने त्याचे उत्पादन वाढवणे हे ट्रम्प प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते, अमेरिकेच्या शस्त्रसाठ्यातील घट ही केवळ लष्करी नव्हे तर भू-राजकीय संकेत देणारी बाब आहे. एकाच वेळी अनेक आघाड्यांवर सक्रिय राहण्याची अमेरिकेची क्षमता टिकवण्यासाठी संरक्षण उत्पादन साखळी मजबूत करणे अपरिहार्य झाले आहे.

दरम्यान आज युध्दाच्या पाचव्या दिवशीही इस्त्रायल आणि इराणचे एकमेकांवर ड्रोन हल्ले सुरूच राहिले, अमेरिकेने लेबनॉनमधून आज आघाडी घेतली. दुसरीकडे स्पेनने अमेरिकेला मदत करण्यास नकार दिला असला तरी अमेरिकेला पाठिंबा देत



आज ग्रीस, फ्रान्स आणि जर्मनीने युध्दात उतरत आपले नौदल सज्ज केले, ब्रिटनने सायप्रस येथील फुजाईराह किनाऱ्यावरील आपल्या लष्करी तळाचे संरक्षण करण्यासाठी एचएमएस ड्रॅगन हे लढाऊ विमान पाठवले असून ते एक आठवड्यात भूमध्य समुद्रात पोहोचेल. इस्त्रायलने आज इराणला धमकी दिली की तुम्ही जो नवा नेता निवडाल त्याचाही आम्ही खात्मा करू.

इस्त्रायल, अमेरिका युद्ध थांबवण्याच्या मनःस्थितीत नसताना इराणही अजून सशक्तपणे हल्ले करीत आहे. आज इराणने दुबईतील अमेरिकी दुतावासावर हल्ला केला, बगदादच्या अमेरिकी दुतावासावर क्षेपणास्त्र डागले, बहारीन, कुवैत, सौदीवर हल्ले सुरूच ठेवले, कतारने हल्ल्यामुळे हवाई मार्ग बंद केला.

## कापुरहोळमध्ये व्यापाऱ्याच्या मुलाचे अपहरण! मुलाची थरारकपणे सुटका

पुणे

**कापुरहोळ** परिसरातील नामांकित व्यापाऱ्याच्या १८ वर्षीय मुलाचे भरदिवसा अपहरण करण्यात आले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. परंतु, जेजुरी पोलीस ठाणे आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे काही तासांतच युवकाची थरारकपणे सुटका करण्यात यश मिळाले. त्याचबरोबर चार आरोपीपैकी अक्षय लक्ष्मण इंगुळकर आणि अक्षय दत्तात्रय भालेराव यांना ताब्यात घेतले. इतर दोन आरोपी पंकज वाल्हेकर आणि गणेश धाडवे फरार झाले.

नवाकाळ

• मुंबई | गुरुवार ५ मार्च, २०२६ • पान -८

## नागालँडच्या विधानसभेत 'वंदे मातरम' सक्तीला विरोध

**कोहिमा** - केंद्रीय गृहमंत्रालयाने फेब्रुवारी महिन्यापासून सर्व सरकारी कार्यालये आणि सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत संपूर्ण सहा कडव्यांसह गाणे बंधनकारक केले आहे. या सक्तीला नागालँडच्या विधानसभेत अनेक सदस्यांनी कडाडून विरोध केला. देशाच्या स्वातंत्र्यापासून आतापर्यंत वंदे मातरम या गीताची फक्त दोन कडवी गायली जात होती. नागालँडच्या विधानसभेत गृह मंत्रालयाच्या या आदेशाला विरोध झाल्यानंतर विधानसभा अध्यक्ष शरिनगेन लाँगकुमेर यांनी हा विषय विधिमंडळाच्या विशेष समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.




## पेट्रोल महागणार असल्याची अफवा
## राज्यभरातील पेट्रोल पंपांवर प्रचंड गर्दी

■ नांदेड

**आखाती** देशात सुरू असलेल्या युद्धामुळे पेट्रोल महागणार आणि पुरवठा कमी होणार अशी अफवा पसरली. होळीमुळे संध्याकाळपर्यंत काही पेट्रोल पंप बंद असल्याने या अफवेला अधिकच बळ मिळाले. परिणामी अमरावती, नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर आणि हिंगोली येथे अनेक पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.



अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील निमखेड बाजारातही पेट्रोल-डिझेलच्या भाववाढीची अफवा पसरली. नांदेडमधील बाफना परिसरातील बाबा पेट्रोल पंपावर वाहनधारकांची मोठी गर्दी झाली. तर परभणी शहरातील भरोसे, दुर्रानी तसेच आर.आर.पेट्रोल पंपांसह अनेक पंपांवर दुचाकीस्वारांनी मोठी रांग लावली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील बिडकीन गावात रात्री उशिरापर्यंत पेट्रोल पंपांवर गर्दी होती. अनेकांनी इंधनाचा साठा करून ठेवण्यासाठी दुचाकी, चारचाकी तसेच डब्यांमध्ये पेट्रोल-डिझेल भरून घेतले.

## इराणी युध्दनौकेवर अमेरिकन पाणबुडीचा हल्ला! ८० ठार

■ कोलंबो

**श्रीलंकेच्या** दक्षिण किनाऱ्याजवळ आज दुपारी इराणी नौदलाच्या युध्दनौकेवर पाणबुडीच्या साह्याने भीषण हल्ला करण्यात आला. हा हल्ला झाल्यानंतर ही युध्दनौका बुडाली. या हल्ल्यात आतापर्यंत ८० इराणी खलाशी ठार झाले आहेत. ३२ जणांना वाचवण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

आयआरआयएस देना युध्दनौका विशाखापट्टणममध्ये झालेल्या बहुराष्ट्रीय नौदल प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी झाली होती. हा कार्यक्रम आटोपल्यानंतर इराणला परत जात असताना या युध्दनौकेवर पाणबुडीच्या साह्याने हल्ला करण्यात आला. त्यावेळी नौकेवर १८० खलाशी होते. बेपत्ता लोकांना शोधण्यासाठी मोहीम सुरू आहे. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सांगितले की, अमेरिकेच्या पाणबुडीने हिंद महासागरात इराणी जहाजाला पाणसुरुंगाने लक्ष्य करून बुडवले. या संदर्भात इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने माहिती देताना सांगितले की, युध्दनौकेवरील ३२ जणांना वाचवण्यात यश आले आहे.

## लंडन-मुंबई विमान तिकीट ९ लाखांवर

■ लंडन

**इस्त्रायल-अमेरिका** लष्करी कारवाईचा परिणाम आखाती आणि युरोप मधील उड्डाणांवर झाला आहे. लंडन-मुंबई विमानाचे तिकीट ९ लाख रुपयांपर्यंत पोहोचले आहे. ट्रॅव्हल एजंटांचा सल्ला आहे की, जर युरोप किंवा आखाती देशांचा प्रवास आवश्यक नसेल, तर किमान एक महिन्यापर्यंत प्रवास टाळावा. पश्चिम आशियातील परिस्थिती स्थिर होईपर्यंत हवाई भाडे, उड्डाण रद्द होणे आणि संचालनातील अडथळे सुरू राहण्याची शक्यता आहे.

लंडन ते मुंबई विमान प्रवाशांच्या अडचणी वाढल्या आहेत. अनेक प्रवाशांची आधीच बूक केलेली तिकिटे रद्द झाली आहेत. कस्टमर केअरशी संपर्क साधणे कठीण झाले आहे. रिफंड प्रक्रियेबाबत स्पष्ट माहिती नाही. नवीन तिकिटे खूप महाग आहेत. इकॉनॉमी क्लासचे

### प्रवास टाळण्याचा सल्ला

तिकीट जिथे सामान्यतः २० ते ५० हजार रुपयांमध्ये असते, तेथे ते २.९ लाख रुपयांपर्यंत गेले आहे. तर बिझनेस क्लासचे तिकीट १.२ ते २.५ लाखांवरून वाढून ९ लाख रुपयांपर्यंत पोहोचले आहे. विमान कंपन्यांचे म्हणणे आहे की, आखाती प्रदेश टाळताना उड्डाणांना पर्यायी मार्ग वापरावे लागत असल्याने प्रवास लांबचा होत आहे. त्यामुळे इंधन खर्चात वाढ होत आहे. कर्मचाऱ्यांच्या ड्युटी वाढल्या असून अन्य खर्च वाढले आहेत. सोमवारी ७०० विमान उड्डाणे रद्द झाली. मंगळवारीही बंगळुरु, मुंबई आणि दिल्ली विमानतळांवर सुमारे २३० उड्डाणे रद्द झाली. भारतीय कंपन्या एअर इंडिया आणि इंडिगो या वाढलेल्या भाड्यामुळे किमान विमान फेऱ्या चालवत आहेत.

तर खाडी प्रदेशातून प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी एतिहाद एअरवेज आणि एमिरेट्सने अतिरिक्त उड्डाणे चालवण्याची घोषणा केली आहे.

## शेअर बाजार कोसळला
## १० लाख कोटींचे नुकसान

■ मुंबई

**पश्चिम** आशियामध्ये सुरू असलेल्या युध्दाचे प्रतिकूल परिणाम आज भारतीय शेअर बाजारावर दिसून आले. दोन्ही प्रमुख निर्देशांकांमध्ये आज पुन्हा एकदा मोठी घसरण झाली. या घसरणीमुळे गुंतवणुकदारांचे सुमारे दहा लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युध्दाची व्याप्ती आज अधिकच वाढली. त्यामुळे गुंतवणुकदारांमध्ये घबराट माजली. परिणामी राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २४,५०० अंकांच्या खाली बंद झाला. तर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ११२२.६६ अंकांच्या मोठ्या घसरणीसह ७९,११६.१९ अंकांवर बंद झाला. सेन्सेक्समध्ये आज १.४० टक्के तर निफ्टीमध्ये १.५५ टक्क्यांची घसरण झाली. एकूण ३,१०५ कंपन्यांचे समभाग आज घसरले.

## स्पेनशी व्यापार संबंध तोडू! डोनाल्ड ट्रम्प यांची धमकी

■ वॉशिंग्टन

**इराणविरुद्धच्या** युद्धात अमेरिकेला कोणत्याही प्रकारची मदत न करण्याच्या स्पेनच्या भूमिकेवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प प्रचंड संतापले आहेत. यापुढे स्पेनशी सर्व व्यापार संबंध आम्ही तोडून टाकू, अशी धमकी ट्रम्प यांनी आज दिली. स्पेनप्रमाणे ब्रिटननेदेखील या युध्दात अमेरिकेला साथ देणार नाही, असे स्पष्ट केले आहे. त्यावरून ट्रम्प यांनी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यावरही टीका केली.

स्पेनने अमेरिका-इराण युद्धावर आपली भूमिका स्पष्ट केली. इराणवर हल्ले करण्यासाठी आपल्या लष्करी तळांचा वापर करू देण्यास अमेरिकेला मनाई केली आहे. स्पेनमध्ये डाव्या पक्षांची सत्ता आहे आणि पंतप्रधान पेड्रो सांचेझ हे युरोपमधील ट्रम्प यांच्या कडव्या विरोधकांपैकी एक आहेत. त्यांनी आपल्या सरकारची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, अमेरिका स्पेनचे लष्करी तळ बऱ्याच काळापासून वापरत आहे. मात्र संयुक्त राष्ट्रांनी आखून दिलेल्या चौकटीत राहूनच अमेरिकेला स्पेनचे तळ वापरण्याची परवानगी दिली आहे. कोणत्याही देशावर हल्ले करण्यासाठी आम्ही आमच्या भूमीचा वापर करू देणार नाही. सांचेझ यांच्या या भूमिकेवर व्हाईट हाऊसमध्ये जर्मनीचे चान्सलर फ्रेडरीक मर्झ यांच्यासोबत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ट्रम्प यांची चांगलीच आगपाखड केली. अर्थ विभागाचे सचिव स्कॉट बेसेंट यांना आपण स्पेनसोबतचे सर्व व्यापारी करार रद्द करण्यास सांगितले आहे, असे ट्रम्प यांनी सांगितले. दुसरी बाब म्हणजे सांचेझ यांनी नाटो राष्ट्रांमध्ये मांडण्यात आलेल्या संरक्षण खर्चात पाच टक्क्यांपर्यंत वाढ करण्याच्या ठरावावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला आहे. ट्रम्प या ठरावासाठी आग्रही आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## अली खामेनी यांच्या मृत्यूचा
## लेह-लडाखमध्ये सामूहिक शोक

■ लेह

**अमेरिका**-इस्त्रायल हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येनंतर लेह आणि कारगिल (लडाख) येथे अंजुमन इमामीया लेह आणि मजलिस-ए-उलेमा यांनी विशेष धार्मिक विधी आणि सामुदायिक नमाज-ए-जनाझा (अंत्यविधीचा नमाज) आयोजित केला आहे. निधनानंतर चौथ्या दिवशी फातिहा खवानी म्हणजे विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आली.

गेल्या दोन दिवसांपासून शिया मुस्लीम मोठ्या प्रमाणावर निदर्शने आणि शोक मिरवणुका काढून सामूहिक शोक व्यक्त करत आहेत. आज शिया मुस्लिमांनी हाती काळे झेंडे हातात घेऊन अमेरिका आणि इस्त्रायलविरोधात घोषणाबाजी करून इराणला पाठिंबा दिला. अंजुमन इमामिया लेह आणि मजलिस-ए-उलेमा यांच्या नेतृत्वाखाली हजारो लोक लेहमधील एनडीएस मैदान आणि कारगिलच्या रस्त्यांवर उतरले. निदर्शकांनी काळे कपडे परिधान केले होते आणि खामेनी यांची पोस्टर हाती घेतली होती. निदर्शकांनी या अमेरिका-इस्त्रायलच्या धोरणांना आणि हल्ल्यांना मानवताविरोधी असे संबोधले.

## मुंबईतील 'नदी यात्रा' ८ मार्च रोजी होणार

■ मुंबई

**महानगरी** मुंबईतील नद्यांच्या स्वच्छतेबद्दल जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या आणि पर्यावरणदृष्ट्या अत्यंत संवेदनशील अशा या विषयाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने दरवर्षी आयोजित केली जाणारी नदी यात्रा यावर्षी रविवार ८ मार्च रोजी दहिसर येथील नदीकिनारी आयोजित करण्यात आली आहे.

मुंबई मार्च या मुंबईकरांच्या संघटनेच्या वतीने या नदी यात्रेचे आयोजन केले जाते. हे नदी यात्रेचे बारावे वर्ष आहे.



मुंबई मार्च ही संघटना २०११ मध्ये स्थापन करण्यात आली. संघटनेची पहिली नदी यात्रा २०१५ साली झाली. या नदी यात्रेला मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दरवर्षी नदी यात्रेत सहभागी होणाऱ्या मुंबईकरांच्या संख्येत वाढ होत गेली. या माध्यमातून होणाऱ्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश मिळाले. म्हणजेच सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांसारखी अवकळा आलेल्या मुंबईतील नद्यांची अवस्था काही प्रमाणात सुधारत आहे. या अनोख्या उपक्रमाबद्दल आयोजकांनी सांगितले की, गेल्या पंधरा वर्षांमध्ये मुंबईतील नद्यांकडे पाहाण्याचा मुंबईकरांचा दृष्टिकोन बऱ्याच अंशी बदलला आहे. मुंबईत दहिसर,पोईसर, ओशिवरा आणि मिठी अशा चार नद्या आहेत. परंतु बहुतांश मुंबईकरांना याची कल्पनाही नव्हती. नदी यात्रेच्या माध्यमातून आम्ही जनतेमध्ये नदीचे जिवंत राहणे पर्यावरणासाठी किती आवश्यक आहे.

## भारताच्या परराष्ट्र धोरणाने माती खाल्ली! राऊतांची टीका

■ मुंबई

**इराणचे** सर्वोच्च नेते आयातुल्ला खोमेनी अमेरिका-इस्त्रायलच्या हल्ल्यात मारले गेले. मात्र भारताच्या वतीने पंतप्रधान मोदींनी इराणला शोकसंदेशही पाठवला नाही. यावरून आज उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी मोदींवर टीका केली. खामेनींच्या हत्येवर मोदींनी पाळलेले मौन पाहून आपले परराष्ट्र धोरण माती खाते की काय असे वाटते, अशा शब्दात त्यांनी मोदींवर टीका केली.

कोणत्याही देशाचा सर्वोच्च नेता अशाप्रकारे युध्दात मारला गेला तर त्या देशाला शोकसंदेश पाठवणे हा शिष्टाचार आहे. भले तो देश आपला शत्रू असला तरी आपल्याला हा शिष्टाचार पाळावा लागतो. मात्र मोदींनी हा साधा शिष्टाचार पाळला नाही. यावरून आपले परराष्ट्र धोरण काय लायकीचे आहे, हे जगाने पाहिले, असे राऊत म्हणाले. युध्दाबद्दल बोलताना राऊत यांनी युध्द एपस्टिन फाईलवरून लोकांचे लक्ष अन्यत्र वळवण्यासाठी ट्रम्प आणि काही राष्ट्रप्रमुखांनी रचलेले कारस्थान आहे, असा दावा केला.

## देहूत आज बीजसोहळा! भाविकांच्या दिंड्या दाखल

■ देहू

**संतश्रेष्ठ** तुकाराम महाराज बीज सोहळा उद्या गुरुवार ५ मार्च रोजी होणार आहे. त्यासाठी राज्याच्या विविध भागांतून भाविकांच्या दिंड्या देहूनगरीत दाखल झाल्या आहेत. त्यामुळे इंद्रायणी नदी काठ भाविकांच्या गर्दीने फुलून गेला आहे.

या सोहळ्याबाबत संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे आणि दिलीप महाराज मोरे यांनी सांगितले की, संस्थानच्या वतीने मुख्य देऊळवाडा आणि वैकुंठगमन स्थान येथील मंदिरांची विद्युत रोषणाई व रंगरंगोटी करण्यात आली आहे. मुख्य देऊळवाड्यात ३२ सीसीटीव्ही आणि वैकुंठगमन स्थान मंदिर



परिसरात कॅमेरे बसविले आहेत. बीजसोहळ्याला उद्या पहाटेपासून सुरूवात होईल. पहाटे ३ वाजता मुख्य देऊळवाड्यात काकड आरती, पहाटे ४ वाजता श्री पूजा व संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात महापूजा, संस्थान अध्यक्ष, विश्वस्त, वंशज व वारकरी यांच्या हस्ते पहाटे ४.३० वाजता विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महापूजा, पहाटे ६ वैकुंठगमन स्थान येथील संत तुकाराम महाराज मंदिरात महापूजा, सकाळी १० वाजता वैकुंठगमन स्थान मंदिराकडे पालखी मार्गस्थ होईल.

सकाळी १० ते दुपारी १२ वाजता वैकुंठगमन सोहळ्यावर देहूकर महाराज यांचे कीर्तन आणि दुपारी १२.३० वैकुंठगमन स्थान येथून पालखीचे मुख्य देऊळवाड्यात आगमन होऊन रात्री पारंपरिक फड व दिंड्यांकडून कीर्तन होईल.

## बाबा सिद्दीकी हत्येत बिल्डर लॉबीचा संबंध नाही! प्रतिज्ञापत्र सादर

■ मुंबई

**माजी** मंत्री बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणात बिल्डर लॉबीचा कोणताही संबंध नसल्याचे मुंबई पोलिसांनी मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट केले.

सिद्दीकी यांच्या पत्नी शहझीन सिद्दीकी यांनी पोलीस तपासावर आरोप केले होते की, वांद्रे ते अंधेरी दरम्यानच्या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांमधील वजनदार बिल्डरांची चौकशी जाणीवपूर्वक टाळली. तसेच, पोलीस तपास अपूर्ण आणि दिशाभूल करणारा असल्याचा दावा त्यांनी न्यायालयात केला होता.

मात्र पोलिसांनी हे आरोप खोडताना प्रतिज्ञापत्रात नमूद केले की, हा आरोप केवळ तपास अधिकाऱ्यांवर दबाव निर्माण करण्यासाठी केला आहे. सहायक पोलीस आयुक्त किशोरकुमार शिंदे यांनी न्यायालयासमोर सांगितले की, साक्षीदारांचे जबाब, तांत्रिक पुरावे आणि दस्तऐवजांच्या आधारेच कायद्याने निर्धारित प्रक्रियेनुसार आरोपपत्र दाखल केले आहे.

## महिलांच्या बचावासाठीच्या निर्भया गाडीच्या ड्रायव्हरचा दारू पिऊन धिंगाणा

■ ठाणे

**नवी** मुंबईतील खारघर परिसरातील बेलपाडा भागात निर्भया पथकाच्या गाडीचा ड्रायव्हर राम पवार याने दारू पिऊन रस्त्यावर धिंगाणा घातला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होताच राम पवार याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राम हा खारघर पोलीस ठाणे येथे ऑफिस बॉय म्हणून काम करतो. पोलीस ठाण्यात चहा-पाणी आणण्याचे काम करणारा हा तरुण निर्भया पथकाची गाडी घेऊन आला आणि खाली उतरून दारूच्या नशेत झोकांड्या देत रस्त्यावर इकडे तिकडे पडत होता.त्याला उभे राहता येत नव्हते



इतकी तो दारू प्यायला होता .निर्भया पथकाच्या गाडीची चावी त्याच्याकडे कशी आली, असा प्रश्न विचारला जात आहे. महिलांच्या संरक्षणासाठी पोलिसांचे निर्भया पथक स्थापन केले आहे. ११२ क्रमांक फिरवला तर महिलेला पोलिसांकडून लगेच मदत मिळू शकते अशी सोय केली आहे. यासाठी पोलिसांना गस्ती घालत महिलांचे रक्षण करण्यासाठी निर्भया पथकाला खास गाड्या दिल्या आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी असलेली गाडी दारू पिऊन नशेत असलेल्या तरुणाच्या हाती देणे हा गंभीर गुन्हा आहे. यामुळे केवळ या तरुणावरच नव्हे तर ही गाडी त्याच्या हाती देणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करा, अशी मागणी करण्यात येत आहे .

## अजित पवारांच्या हयातीत दिलेले ३ प्रदेशाध्यक्षांचे राजीनामे मंजूर

■ पुणे

**उपमुख्यमंत्री** अजित पवार हयात असताना राष्ट्रवादीच्या असंघटित कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे , उद्योग विभागाचे

### सुनील तटकरेंवर नाराज

प्रदेशाध्यक्ष सुभाष मालपाणी, मोटार मालक वाहतूक संघटना प्रदेशाध्यक्ष सचिन जाधव यांनी पदाचा राजीनामा दिला होता. ते राजीनामे अजित पवार यांनी मंजूर केले नव्हते, पण त्यांच्या अपघाती मृत्यूनंतर हे राजीनामे आता मंजूर करण्यात आले आहेत. यामुळे सुनील तटकरे यांच्या विरोधात नाराजी पसरली आहे.

२६ जानेवारी रोजी अजित पवार पालकमंत्री म्हणून पुण्यातील पक्ष कार्यालयात आले होते. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमालाही हजेरी लावली. यानंतर पक्ष कार्यालयात काही निवेदने त्यांच्याकडे देण्यात आली होती. यामध्ये मनोज व्यवहारे, सुभाष मालपाणी आणि सचिन जाधव यांच्या राजीनाम्यांचा समावेश होता.

या तिघांनी वरिष्ठांकडून योग्य वागणूक आणि सहकार्य मिळत नसल्याची भावना व्यक्त करत राजीनामा दिल्याचे नमूद केले होते. या नाराजीचा रोख थेट सुनील तटकरे यांच्याकडे असल्याचे बोलले जाते. त्यावेळी अजित पवार यांनी हे राजीनामे स्वीकारले नव्हते.

## चिनी निर्बंधांमुळे दुर्मीळ खनिजांसाठी जपानची भारताबरोबर भागीदारी

**चीनने दुर्मीळ खनिजांच्या निर्यातीवर निर्बंध लावल्यानंतर जागतिक स्तरावर महत्त्वाच्या खनिजांच्या पुरवठा साखळीबाबत चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर जपानने भारतासोबत धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. चुंबक उत्पादन, इलेक्ट्रिक वाहन उद्योग, संरक्षण क्षेत्र आणि हरित ऊर्जा प्रकल्पांसाठी अत्यावश्यक असलेल्या दुर्मीळ पृथ्वी घटकांसाठी चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचा जपानचा प्रयत्न असल्याची माहिती आहे.**



■ टोकिओ

भारतातील राजस्थान आणि गुजरात राज्यांमध्ये आढळलेल्या दुर्मीळ पृथ्वी खनिज साठ्यांच्या संयुक्त शोध आणि विकासाबाबत दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू आहे.

» पान ७ वर

## तपोवनात हजारो झाडांची कत्तल प्रतिज्ञापत्र द्या! हायकोर्टाची नाराजी

■ मुंबई

**नाशिकच्या** कुंभमेळ्यात साधुग्राम उभारण्यासाठी तपोवनातील १,८०० झाडांच्या कत्तलीविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर प्रतिज्ञापत्र सादर करण्यास चालढकल करणाऱ्या नाशिक महापालिका व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या कार्यपद्धतीवर उच्च न्यायालयाने संताप व्यक्त केला. मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने सबबी सांगू नका. प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी ही शेवटची संधी अशी तंबी देत याचिकेची सुनावणी दोन आठवडे तहकूब ठेवली. तसेच हरित लवादासमोर सुरू असलेले प्रकरण उच्च न्यायालयात वर्ग करण्याची मागणी फेटाळली. खंडपीठाने तूर्तास ही वृक्षतोड सुरु करू नये असे तोंडी निर्देश मागील सुनावणीच्या वेळी दिले.

कुंभमेळ्यासाठी तपोवनातील हजारो झाडांची कत्तल करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्याला शिवसेनेसह पर्यावरणवाद्यांकडून विरोध करण्यात येत असतानाही झाडे तोडण्याचा रेटा निर्दयी सरकारने लावून धरला. या विरोधात कायदेशीर दाद मागण्यासाठी मनसे सरसावली असून तपोवनातील वृक्षांची कत्तल करू नका, अशी मागणी करत मनसे शहर उपाध्यक्ष ॲड. नितीन पंडित यांनी याचिका दाखल केली आहे.

## राज्य सरकारच्या धोरणानुसार जैन जिमखान्याला जमीन

### सरकारचे स्पष्टीकरण

■ मुंबई

**मुंबईतील** विल्सन कॉलेज ते जैन जिमखाना परिसरातील जागेच्या वादावर राज्य सरकारने विधिमंडळात सविस्तर स्पष्टीकरण दिले. यासंर्भात शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांच्यासह त्यांच्या पक्षाच्या इतर आमदारांनी प्रश्न उपस्थित केला होता. सरकारी धोरणानुसार जैन जिमखान्याला जमीन देण्यात आली, असे सरकारन सांगितले.

सरकारच्या वतीने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लेखी उत्तर सादर केले. त्यानुसार, विल्सन कॉलेज जिमखाना ही जमीन भाडेपट्ट्यावरील अटींचा भंग झाल्याच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सुनावणी घेत ५ डिसेंबर २०२३ रोजी शासनजमा केली. यानंतर महसूल व वन विभागाने १६ मार्च २०२४ रोजी ही सरकारी जमीन जिमखाना चालविण्याच्या उद्देशाने जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या संस्थेला ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी दिली.